

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.



# भाग्योदय
## अथवा
# सचोटीचें बक्षीस



IRBK-0103816

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ - सदन
गिरगांव, मुंबई

नोंद क्र. ३८७६

# भाग्योदय

अथवा

# सचोटीचें बक्षीस

लेखक

जगन्नाथ विष्णु बा[illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई
अनुक्रम 24430
विभाग
क्रमांक
नों. दि. 20/3/50

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३८७८ नों. दि. ............
वि. ......वा.वा....... क्र. ............

IRBK-0103816

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0103816

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९३२
पुनर्मुद्रण : १९५१

मुद्रक : वा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : के. भि. ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

गोपूसारख्या सुशील व
होतकरू मुलांस आणि
भगवंतरावांसारख्या
सद्गृहस्थांस
अर्पण

# दोन शब्द

हें पुस्तक लहान मुलांमुलींकरितां लिहिलें आहे. त्यापासून बालवाचकांना पुष्कळ बोध घेतां येईल व घटकाभर त्यांची चांगली करमणूकही होईल अशी आशा आहे.

मोठमोठ्या शहरांतून गरीब, अनाथ परंतु सुशील आणि स्वाभिमानी मथुराबाईसारखीं किती तरी अनाथ कुटुंबें मोठ्या कष्टानें दिवस काढीत असतात. अशांना मदत होणें अत्यंत जरूर आहे. भगवंतरावांसारखे परोपकारी व गरिबांचे कनवाळू असे सद्‌गृहस्थ जितके जास्त आढळतील तितके हवेच आहेत.

वय अवघें १३–१४ वर्षांचें, घरची अत्यंत गरिबी, मदत करणारा कोणीही नाहीं, अशा स्थितींत धीर न सोडतां, सकाळीं मधुकरी मागून, दुपारीं शाळेंत जाऊन मन लावून अभ्यास करून, संध्याकाळीं फेरीवाल्याप्रमाणें हिंडून थोडेबहुत पैसे स्वतंत्र रीतीनें मिळवून आपल्या सद्गुणी आईला मदत करण्याची महत्त्वाकांक्षा धरून त्याप्रमाणें वर्तन करणाऱ्या गोपूचें कोण बरें कौतुक करणार नाहीं ?

प्रामाणिकपणानें वागल्यानें मनाला जें समाधान वाटतें त्याची बरोबरी कशानेंही होणार नाहीं. प्रामाणिकपणा हा मोठा सद्गुण आहे. सुशील व थोर अंतःकरणाच्या मथुराबाईच्या शिकवणीमुळें गोपू प्रामाणिकपणें वागला व त्यामुळेंच त्याचा अखेर भाग्योदय झाला.

मुलांनो, तुम्हीही सचोटीनें चाला, शरीर बळकट ठेवा, वृत्ति नेहमीं आनंदी व उल्हासी असूं द्या, मन लावून अभ्यास करा व आपल्या आईचा अमूल्य उपदेश नेहमीं ऐकत जा म्हणजे आमच्या गोपूप्रमाणें तुमचेंही सर्वांचें कल्याण होईल.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें काम रा. केशव भिकाजी ढवळे ह्यांनीं मोठ्या आनंदानें पत्करलें ह्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

पुस्तक लिहीत असतां ज्यांचा ज्यांचा उपयोग झाला त्या सर्वांचे आभार मानून हे दोन शब्द पुरे करतों.

सर्वांचा नम्र

**ज. वि. बापट**

# प्रकरण पहिलें

२८८३०. वा.वा. ८५८ २१३१५

" कापूर—उदबत्ती, म्हैसुरी सुवासिक अगरबत्ती " असें मोठ्यानें ओरडत एक सुमारें १४–१५ वर्षांचा मुलगा मंडईच्या रस्त्यावरून फिरत होता. संध्याकाळ झाली असल्यामुळें दुकानांतून व रस्त्यावरून दिव्यांचा लखलखट झालेला होता. दिवाळीचे दिवस जवळ आल्यामुळें रस्त्यावरून लोकांची गर्दीही पुष्कळ होती.

भगवंतराव नांवाचे एक गृहस्थ समोरून घाईघाईनें येत होते. फुलाच्या दुकानांतून पुडा घेऊन ते पलीकडे वळणार इतक्यांत एक टांगा वाटेंत आल्यामुळें ते थांबले व इकडे तिकडे बघूं लागले.

" काय रावसाहेब, कापूर—उदबत्ती देऊं? सुवासिक आहे " असें म्हणून गोपूनें ( हें त्या मुलाचें नांव ) उदबत्तीचे दोन पुडे त्यांच्या समोर केले. भगवंतरावांनाही त्या जिनसा पाहिजे होत्या. त्यांनीं गोपूकडे व गोपूच्या पोषाकाकडे निरखून पाहिलें व एक दोन उदबत्त्यांचे पुडे, दोन कापराचे पुडे, कांहीं गंधाचे रवे, वगैरे जिनसा त्याजजवळून विकत घेतल्या.

नंतर खिशांतून घाईघाईनें पैसे काढून भगवंतरावांनीं ते गोपूच्या हातावर ठेवले व आपण पुढें निघून गेले. गोपूनेंही ते सर्व पैसे इकडे-तिकडे बघत असतांना आपल्या खिशांत ठेवून दिले. भगवंतरावांनीं दिलेल्या पैशांत बहुतेक सर्व खुर्दाच होता; निदान त्यांचा तरी तसा समज झालेला होता.

भगवंतरावांनीं हातावर ठेवलेले पैसे गोपूनें नीट न पाहतां तसेच आपल्या जुन्या कोटाच्या ( गोपूचा कोट व विजार बरीच जुनी, ठिगळें जोडलेली पण स्वच्छ अशी दिसून येत होती ) खिशांत चटदिशीं टाकून दिले व " कापूर—उदबत्ती, सुवासिक अगरबत्ती " असें खणखणीत

आवाजांत ओरडत पुन्हा आपल्या मालाची. विक्री करण्याकरितां तो मोठ्या चलाखीनें इकडे तिकडे हिंडूं लागला. "कापूर उदबत्ती! कापूर उदबत्ती!"

असें होतां होतां बरींच संध्याकाळ होऊन गेली. (७॥ वाजण्याचा सुमार झाला होता.) गिऱ्हाइकांची गर्दीही थोडी कमी होत चालली. गोपूस आतां कोठें थोडी विश्रांति मिळाली. त्या दिवशीं गोपूचा मालही जरा जास्तच खपलेला होता. एकंदर विक्री किती झाली हें पाहण्याकरितां तो आतां बराच उतावीळ झाला. अजूनपर्यंत, त्यानें पैसे किती मिळाले हें पाहिलेंच नव्हतें; कारण गिऱ्हाइकांची गर्दी असल्यामुळें तिकडे त्याचें लक्षच गेलें नाहीं किंवा त्याला आठवणही झाली नाहीं. आतां थोडी फुरसत मिळतांच त्यानें संध्याकाळपासून विक्रीचे मिळालेले, एकंदर पैसे मोजण्याकरितां, खिशांत हात घालून खिशांतून पैसे काढून मुठींत घेतले व ह्या हातांतून त्या हातांत असे मोजूं लागला. पैशांकडे नजर जातांच गोपू एकदम दचकला! कारण त्याच्या हातांतील खुर्द्यांत एक कोरा रुपया चमकत होता.

आश्चर्य वाटून त्यानें तोंडानें हळूच शीळ घातली व हें असें कसें झालें असावें ह्याचा तो मनाशीं विचार करूं लागला.

"हां, हें असेंच असलें पाहिजे. मघाशीं त्या गृहस्थांनीं पैशांऐवजीं चुकून हा रुपया दिला असला पाहिजे. ही त्यांची नजरचूक असावी." ते गृहस्थ दिसताहेत किंवा नाहीं हें पाहण्याकरितां गोपूनें झट्दिशीं भोंवतालीं निरखून पाहिलें. परंतु भगवंतराव मघाशींच निघून गेलेले होते.

आपण आतां काय समजावें, हें त्या मुलाच्या प्रथम ध्यानांत येईना. परंतु थोड्याच वेळानें त्याच्या डोळ्यांत एक प्रकारचें तेज चमकूं लागलें व त्याची मुद्रा प्रफुल्लित झाल्यासारखी दिसली. त्याच्या अंतःकरणास फार आनंद झालेला होता.

"आतां ह्या रुपयांत" .दोन तीन सेकंद मनाशीं विचार करून तो म्हणाला, "शांतीला आणि आईकरितां किती तरी सुरेख जिनसा आणतां

येतील. मी काय बरें आणूं? हां हां! बरी आठवण झाली. शांतीला फटाके, साखरेचीं चित्रें, परकरांकरितां कोरें कापड, नवीन चित्रांचें पुस्तक......" पांच रुपयांत देखील दुसऱ्या कोणाला जितक्या जिनसा खरेदी करतां येणार नाहींत, त्याच्याहीपेक्षां किती तरी जास्त वस्तु त्या मुलानें आपल्या मनांतल्या मनांत खरेदी सुद्धा करून टाकिल्या! लहान मुलांचें हें असेंच असतें.

गोपूच्या मनोराज्यांत एकदम खंड पडला. कारण दुसरें ,एक गिऱ्हाइक कापूर घेण्याकरितां त्याजपाशीं आलें. त्यानंतर पुन्हा आणखी गिऱ्हाइकें आलीं. त्यांना माल देण्याच्या कामीं गुंतल्यामुळें गोपूस त्या रुपयासंबंधीं आठवण होण्यास फुरसतच सांपडली नाहीं.

आठ वाजून गेले व घरीं निघण्याची त्याची वेळ झाली. एकंदर विक्री किती झाली हें त्यानें पाहिलें तेव्हां त्याच्या नजरेस असें आलें कीं त्या रुपयाखेरीज आणखी ७-८ आणे (खुर्दा व एक दोन आणेल्या) मिळालेले आहेत. म्हणजे एकंदर जवळ जवळ दीड रुपया! "एकूण आज संध्याकाळीं बरेच पैसे मिळाले." तो मनांत म्हणाला, "बरेच नव्हे, पुष्कळच! मी तर आज श्रीमंत झालों. इतकी विक्री अजून संध्याकाळच्या वेळीं कधींच झालेली नव्हती" गोपूचा आनंद पोटांत अगदीं मावेनासा झाला.

घरीं येण्यास निघाला तेव्हां, नेहमींप्रमाणें सावकाश चालणें त्याच्याच्यानें होईना. तो धावतच सुटला. आनंदाची बातमी (पुष्कळ पैसे मिळाल्याची) घरीं कळविण्याकरितां तो अगदीं उत्सुक झालेला होता.

एका पैशाऐवजीं चुकून एक रुपया मिळाला म्हणून गोपूस इतका आनंद कां व्हावा हें नीटपणें समजण्यास गोपूच्या स्थितीची व घराची माहिती होणें आवश्यक आहे. गरीब गोपूच्या बिऱ्हाडासंबंधीं माहिती कळली म्हणजे गोपूस, एक पैशाऐवजीं चुकून एक रुपया मिळाला, म्हणून इतका आनंद कां व्हावा ह्याचें आपणास विशेष आश्चर्य वाटणार नाहीं.

एक दोन रस्ते ओलांडून, कोपऱ्यावरून वळून गोपू एका अरुंद बोळांत शिरला. त्या बोळांत फारच अंधेर होता. कारण बोळामध्यें एका टोंकास म्युनिसिपालिटीचा एक कंदील मंदपणें जळत होता.

हा बोळ खरोखर फार गलिच्छ होता. सुरुवातीसच कचऱ्याची पेटी होती. बोळ फार अरुंद, रस्ता अत्यंत खराब असा असल्यामुळें पावसाळ्या दिवसांत तर त्यांत पाऊल टाकण्याची बिलकुल सोय नसे. कारण चिखल फार सांचे. बोळाच्या दोन्ही बाजूंस जुने, मोडकळीस आलेले वाडे व घरें अगदीं लागून असल्यामुळें ह्या बोळांत स्वच्छ ऊन फार पडत नसे. त्यामुळें येथील हवा फार खराब होती. बहुतेक प्रत्येक घरांत ओल होतेंच ! कांहीं घरांत ४–४ बिऱ्हाडें दाटीनें राहत. कांहीं कांहीं गरीब बिऱ्हाड-करूंची जागा बोळाच्या रस्त्यापेक्षां देखील सखल होती ! अशा ह्या घाणेरड्या बोळांत एका घाणेरड्या व पडक्या, ओल आलेल्या वाड्याशेजारीं गरीब बिचाऱ्या गोपूचें बिऱ्हाड होतें. त्यांच्या फक्त दोन खोल्या होत्या. दोन खोल्यांमधील भिंत तर कुडाची होती. त्यांच्या स्वयंपाकाच्या खोलीस निराळी अशी खिडकी नव्हती. भिंतीसच वरच्या बाजूस एक लहान भगदाड पडलेलें असून त्यांत ३–४ विटा आडव्या ठेवून एक तऱ्हेची खिडकी बनविण्यांत आली होती. त्यांच्या बिऱ्हाडाच्या खोलीस आंतून कडी कुलूप देखील लावण्याची सोय नव्हती !

अशा त्या घाणेरड्या जागीं गोपू, त्याची आई मथुराबाई व गोपूची बहीण शांता—सुमारें ५–६ वर्षांची—ह्यांना राहावें लागत असे. कारण त्यांची घरची अत्यंत गरिबी होती त्यामुळें जास्त भाड्याच्या जरा चांगल्या जागीं राहतां येणें त्यांना शक्य नव्हतें. त्या सबंध बोळांत त्यांच्याइतकें गरीब कुटुंब दुसरें कोणी नव्हतें. त्या दोन घाणेरड्या खोल्यांबद्दल त्यांना ५ रुपये भाडें द्यावे लागे !

गोपू घरीं पोंचला तेव्हां साडेआठ वाजले होते. दरवाजा उघडून गोपू खोलींत गेला. लहानगी शांता किंचित् पेंगूं लागली होती. ती गोपूचीच

वाट पाहत होती. पलीकडे मथुराबाई एका मिणमिण्या समईपाशीं पाठमोऱ्या बसून कांहीं तरी शिवत बसल्या होत्या. समईंतील तेलही संपत येत चाललें होतें. मथुराबाईंना शिवणकाम थोडें बहुत येत होतें. त्यामुळें शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या मुलांमुलींचे सदरे, विजारी, पोलकीं, परकर वगैरे कपडे मधून मधून त्या शिवून देऊन थोडेबहुत पैसे मिळवीत. परंतु तेवढ्यानें कसें भागेल? गोपूची शाळेंतील फी, घरभाडें, कपडे, खाणेंपिणें, वगैरे सर्व गोष्टींना पैसे पुरत नसत. त्यामुळें त्यांची फार दैना उडे. परंतु मथुराबाई ही फार मानी, करारी व धीराची बायको होती. स्वभावानें ती फार सद्गुणी व सुशील स्त्री होती. तिची गोपूवर फार भिस्त होती. गोपूही फार हुशार होता. सध्या तो मराठी चौथींत होता.

गोपू सकाळीं माधुकरी मागून आणी व जेवण करून शाळेंत जाई. शाळा सुटली कीं एक तासभर अभ्यास करून पुन्हा संध्याकाळीं, "कापूर–उदबत्ती" वगैरे जिन्नस तो विकावयास जाई व मिळतील ते पैसे घरीं आईपाशीं आणून देई. अशा प्रकारें तें गरीब कुटुंब मोठ्या कष्टानें दिवस काढीत होतें. गोपूनें मॅट्रिक व्हावें अशी त्याच्या आईची फार इच्छा होती. मॅट्रिक झाल्यावर गोपूसारख्या हुशार व तरतरीत मुलास कोठें ना कोठें तरी नोकरी मिळून आपल्याला चांगले दिवस येतील अशी मथुराबाईंची खात्री होती.

मथुराबाई आपल्या कामांत अगदीं गर्क झाल्या असल्यामुळें गोपू केव्हां आंत आला हें त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं. पण गोपूच्या पावलांचा आवाज ऐकतांच लहानगी शांती एकदम सावध झाली व पुढें होऊन त्याला म्हणाली, "गोपूदादा! आलास? आम्ही किती वाट पाहिली. आत्तांच मी जेवलें. गोपूदादा! गोपूदादा!! तुला आज पुष्कळ पैसे मिळाले ना?"

"हो बरं, शांते," गोपू तीस म्हणाला, "मला आज थोडे जास्त पैसे मिळाले."

गोपूच्या चेहेऱ्याकडे पाहून शांतीलाही फार आनंद झाला. प्रफुल्लित मुद्रेनें ती म्हणाली, " गोपूदादा, मला वाटतें तूं आज चार आणे मिळविलेस ! " लहानग्या शांतेला ४ आणे अथवा १६ पैसे ह्यापेक्षां जास्त रकमेची मोजणी करतां येत नसे. त्यामुळें ४ आणे म्हणजे तिच्या मताप्रमाणें फारच मोठी रक्कम होती !

" हत् ! चार आणे ? चार आण्यानें ग काय होणार ? त्याहीपेक्षां किती तरी जास्त पैसे आज मला मिळाले आहेत. " गोपूनें उत्तर दिलें. " सांग बरे, किती असावेत ? "

छातीवर हात ठेवून शांती विचार करूं लागली. पण तिला तर्क होईना. कारण ती जें सांगेल त्यावर गोपूनें म्हणावें, " नाहींच मुळीं ! ह्याहीपेक्षां जास्त. " तेव्हां शांतीला कांहींच तर्क होईना. एवढ्या रकमेची मोजणी करण्याची वेळ तिला अजून आलेलीच नव्हती. अखेर शांती हरली. हें पाहून तिचा भाऊ मोठ्या अभिमानानें म्हणाला, " मला आज रुपया – एक रुपया आणि दोनदा चार आणे ह्याहीपेक्षां थोडे जास्तच पैसे मिळाले आहेत. हे पाहा ! बोल शांते, आतां तुझें काय म्हणणें आहे ? "

" आई ! अग आई !! " शांता आनंदानें ओरडली, " किती तरी पैसे ? आपण आतां श्रीमंत झालों, नाहीं का ग आई ? कित्ती पैसे ! "

आपल्या मुलामुलींचें संभाषण मथुराबाई इतका वेळ नीट लक्ष देऊन ऐकत होत्या. हातांतील काम थोडें बाजूला ठेवून पाठीमागें वळून त्या म्हणाल्या, " गोपू, हे इतके पैसे तुला आज कोठून मिळाले ? कापूर, उदबत्ती, वगैरे विकून तुला जास्तींत जास्त म्हणजे ५।६ आण्यांचेच पैसे नेहमीं मिळतात. मग आज इतके कसे मिळाले ? ह्यामध्यें कोठेंतरी चूक झालेली असली पाहिजे. गोपू मला आशा आहे कीं तुझ्या हातून एखादें दुष्कृत्य घडलेलें नाहीं. " असें म्हणून तिनें आपल्या मुलाकडे काळजीपूर्वक व तीक्ष्ण नजरेनें निरखून पाहिलें.

22830 १३

बिचारा गोपू! बरेच जास्त पैसे मिळवून आणले म्हणून त्याला इतक्यांतच मोठा अभिमान वाटत होता. परंतु आईचें हें बोलणें ऐकून त्याला कसेंसेंच झालें. भगवंतरावांच्या नजरचुकीनें आपणास एक रुपया मिळाला हें पाहतांच त्याच्या मनाला त्यावेळीं जशी अस्थिरता वाटली, त्याचप्रमाणें आतांही त्याला एकदम अस्थिरता वाटूं लागली. तो गोंधळून गेला.

परंतु तो एक प्रामाणिक मुलगा होता आणि आपण कोणतीच वाईट गोष्ट केलेली नाहीं अशीही त्याची खात्री होती; म्हणून लवकरच त्याचें मन ताळ्यावर आलें व तो म्हणाला, " आई, एका सद्गृहस्थानें मला हा रुपया दिला. "

मथुराबाई दचकल्या. " गोपू " त्यांनीं उत्तर केलें, " तुझ्यासारख्या लहान मुलांना सद्गृहस्थ फुकट रुपये कधींच देत नसतात. त्या गृहस्थांच्या करितां तूं काय केलेंस? किंवा असें तर नसेल ना, कीं त्या गृहस्थांची नजरचूक होऊन एक पैसा असें समजून त्यांनीं तुला हा रुपया दिला? "

गोपू लहान होता, तरी आपल्या आईच्या मनांत आपणाविषयीं कोणती शंका आलेली आहे हें त्यानें ओळखलें. " आई! " तो म्हणाला, " माझ्याकडून कांहींच वाईट वर्तन झालेलें नाहीं. ती सर्व हकीकत मी तुला सांगतों. "

त्याप्रमाणें गोपू ती हकीकत सांगावयास लागला. त्याची धाकटी बहीण आपल्या आईच्या मांडीवर रेलून गोपूकडे निरखून बघत ऐकत होती. गोपूचें सांगणें झाल्यावर त्याची आई म्हणाली, " पण गोपू, तूं हा रुपया त्या सद्गृहस्थांना ताबडतोब परत कां केला नाहींस? "

" कारण, हा मला मिळाला आहे हें, मीं जेव्हां बाकीचे पैसे मोजले तेव्हांच माझ्या ध्यानांत आलें. आणि तितक्या वेळांत ते सद्गृहस्थही

केव्हांच दूर निघून गेले होते. शिवाय त्यांचा पत्ता देखील मला माहीत नाहीं. ते कोठें राहतात हें देखील मला माहीत नाहीं." गोपू म्हणाला.

"ते गृहस्थ ह्यापूर्वीं तुझ्या कधीं नजरेस पडले होते काय? त्यांचें नांव तुला माहीत आहे काय?" वगैरे अनेक प्रश्न मथुराबाईनें त्या लहान मुलाला केले व शेवटीं, "ते गृहस्थ पुन्हा त्याच रस्त्यावरून चालले असतां तूं त्यांना ओळखूं शकशील काय?" असें तिनें गोपूला विचारलें.

"हो. तेव्हांच आई" गोपूनें उत्तर दिलें. "पुन्हा ते गृहस्थ एकदा जरी मला दिसले तरी त्यांना मी ताबडतोब ओळखीन. परंतु तुझ्या अशा बोलण्याचें मला किंचित् भय वाटतें. हा रुपया मी जेव्हां खिशांत टाकला त्या वेळेस मीं त्याच्याकडे पाहिलें देखील नव्हतें. इतर पैशांप्रमाणेंच न बघतां तो मीं खिशांत टाकला."

"बरोबर गोपू, आणि माझीही अशीच खात्री झाली आहे, मलाही असें खात्रीपूर्वक वाटतें कीं त्या गृहस्थांचीही तुझ्यासारखीच समजूत झाली असावी. इतर पैसे मोजून तुझ्या हातावर ठेवतांना हा रुपया पैसा समजून तोही इतर पैशांप्रमाणेंच त्यांनीं नजरचुकीनें तुला दिला." मथुराबाई सौम्यपणें म्हणाल्या. "तेव्हां, हा रुपया तुझा झाला असें नव्हे किंवा माझ्याही मालकीचा झाला असें म्हणतां येणार नाहीं आणि म्हणून आपण हा रुपया खरचतां कामा नये."

"पण आई," आई सौम्यपणें बोलत आहे तेव्हां आपल्याविषयीं तिला आलेली शंका नाहींशी झालेली आहे असें वाटून, आनंदित होऊन गोपू म्हणाला, "तुला व शांतीकरितां ह्या रुपयाचा आपणास फार उपयोग होईल आणि त्या गृहस्थांनाही एक रुपया चुकीनें गेला म्हणून विशेषशी फिकीर वाटेल असें मला वाटत नाहीं.

"होय, माझ्या मुला," मथुराबाई म्हणाली, "हा रुपया आपलाच असता तर त्यापासून आपणांस बरीच मदत झाली असती ह्यांत शंका नाहीं. पण असें पाहा, हा कांहीं आपला नव्हे. गोपू, ते गृहस्थ पुन्हा

तुझ्या दृष्टीस पडेपर्यंत हा रुपया तुजजवळच ठेव व ते दिसले म्हणजे हा त्यांना परत कर. आपण जरी गरीब असलों तरी आपणांस नेहमीं प्रामाणिकपणानेंच वागलें पाहिजे. त्याप्रमाणें वागून आपणांस जें समाधान होईल त्याच्या निम्म्यानें देखील समाधान हा रुपया ठेवून घेऊन खर्च करून टाकला असतांना आपल्या मनाला होणार नाहीं."

"हें कसें काय? हें माझ्या ध्यानांत येत नाहीं" गोपू उदासपणें व जरा त्रासानें म्हणाला. त्या रुपयापासून ज्या ज्या जिनसा त्यानें विकत आणण्याचें मनाशीं ठरविलें होतें त्यांतील एकही जिन्नस आपणांस आतां आणतां येणार नाहीं हें आतां कळून चुकल्यामुळें त्याच्या मनाला चांगलाच धक्का बसलेला होता.

"गोपू, जें खरें असेल त्याप्रमाणेंच वागणें हाच सर्वांत उत्तम मार्ग आहे." मथुराबाई म्हणाली, "असें वागण्यापासून आपणांस त्रास होतो किंवा आपलें नुकसान होत आहे असें जरी पुष्कळ वेळां आपणांस वाटूं लागतें, तरी पण तूं हें पक्कें, ध्यानांत ठेव कीं अखेरीस सत्याचाच जय होतो."

गरीब बिचारी शांती! तिचीही फार निराशा झाली. अवघ्या पांच दहा मिनिटापूर्वी, आपण श्रीमंत झालों अशी त्या लहान मुलीची कल्पना झालेली होती. ह्या रुपयापासून आपणांस किती तरी मजेदार खेळणीं घेतां येतील ह्या आनंदांतच ती गर्क होती. "आतां आपणांस एकही जिन्नस आणतां येणार नाहीं. आपण पहिल्यासारखेच गरीब झालों" ह्या गोष्टीनें तिच्या मनास फार दुःख झालें. त्या लहान मुलीचें मन अगदीं खट्टू होऊन गेलें.

आपण करीत आहोंत हीच गोष्ट योग्य आहे अशी तिची खात्री होती. मुलांचा इतका हिरमोड झालेला पाहून मथुराबाईस देखील फार वाईट वाटलें. तिच्याही मनाला ती गोष्ट लागून राहिली.

खरोखर, मथुराबाईंना पैशाची फार जरुरी होती. थंडी कडाक्याची पडूं लागल्यामुळें, मुलांकरितां एक दोन उबेचीं पांघरुणें त्यांना त्या रुपयामधून सहज विकत घेतां आलीं असतीं. तशा पांघरुणाची अत्यंत जरुरी होती. पण पैसेच शिल्लक नव्हते. अशा वेळीं अनायासानेंच प्राप्त झालेला रुपया म्हणजे त्या गरीब कुटुंबाला मोठी देणगीच होती. देणगी देण्यास त्या सुशील कुटुंबाइतकीं लायक माणसें दुसरीकडे क्वचितच आढळलीं असतीं.

परंतु हा रुपया खरोखर आपला नव्हे हें मथुराबाई जाणून होती. रुपयाचा खरा धनी हुडकून काढून तो रुपया ज्याचा त्यास परत करण्याच्या कामीं सर्व तऱ्हेचे प्रयत्न करण्याच्या आधींच जर तो खर्चून टाकला तर ती गोष्ट बरोबर होणार नाहीं हेंही ती जाणून होती.

त्या लहानशा खोलींत थोडा वेळ पूर्ण स्तब्धता पसरली. सर्वांना त्रास देणारा तो रुपया आपल्या कधींच नजरेस पडला नसता तर फार बरें झालें असतें, असें आतां गोपूला वाटूं लागलें. शांती तर जवळ जवळ रडण्याच्या बेतांत होती.

“ असें आहे तर मग, आई ” गोपू अखेरीस म्हणाला, “ आपण आतां ह्याचें काय करावें ? ”

“ आतां असें कर, ” गोपूच्या आईनें उत्तर केलें, “ उद्यां संध्याकाळीं तूं नेहमींप्रमाणें जेव्हां कापूर उदबत्ती विकावयास जाशील तेव्हां त्या सद्गृहस्थांकडे नीट लक्ष ठेव. ते गृहस्थ जर ह्याच शहरांत राहणारे असले तर नेहमींप्रमाणेंच ते संध्याकाळीं त्या रस्त्यावरून जातीलच आणि तुलाही ते दिसतीलच अशी माझी खात्री आहे. तोंपर्यंत हा रुपया मी आपणाजवळच ठेवतें. तुला उद्यां संध्याकाळीं देईन. असो. गोपू, आतां बरीच रात्र झालेली आहे. तूं फार भुकेलेला असशील. चल आधीं कपडे काढ व जेवून घे. तुझें अन्न मीं केव्हांच झाकून ठेवलें आहे. गोपू, त्या रुपयाखेरीज बाकीचे जे पैसे तुला मिळाले आहेत त्यांवर मात्र आपला पूर्ण हक्क आहे. ते खर्च करण्यास कोणाचीच आडकाठी नाहीं. ”

गोपूनें तो रुपया झट्दिशीं आईच्या हातांत दिला. त्या रुपयाचा त्याला आतां फार तिरस्कार वाटत होता. त्याच्याकडे एकदा देखील ढुंकून पाहूं नये असें त्याला वाटलें ! शांतेला रडूं आलें हें पाहून बिचाऱ्या मथुराबाईंच्या अंत:करणांत देखील फार कालवाकालव झाली.

तीं तिघेजण थंडीनें काकडत होतीं. उबदार कपडे त्यांच्या घरांत नव्हते. मुलांकरितां एक दोन उबेचे कोट देखील विकत घेण्याचें आपणांमध्यें सामर्थ्य नाहीं ह्या गोष्टीमुळें मथुराबाईंना फार खेद वाटत होता. तरी देखील तो रुपया खर्च करावा असें त्यांना बिलकुल वाटलें नाहीं. जी गोष्ट खरी असेल त्याचप्रमाणें वागण्याचा त्यांचा दृढनिश्चय होता.

## प्रकरण दुसरें

इतक्या प्रामाणिकपणें वागणाऱ्या व खंबीर अंत:करणाच्या त्या सुशील मथुराबाईंना इतकी गरिबी कशी आली ह्याची आतां आपण थोडी माहिती करून घेऊं.

मथुराबाईची हकीकत बरीच कींव करण्यासारखी आहे. तिचा नवरा श्रीधरपंत हा एका खेडेगांवांत एका कापडवाल्याच्या दुकानीं हिशोब वगैरे लिहिणारा एक गरीब कारकून होता. पण लवकरच त्या कापडवाल्याचें दिवाळें वाजून तें दुकान बंद झालें व श्रीधरपंतांची नोकरी गेली. जवळ थोडें देखील भांडवल नाहीं, स्वत:चें घर नाहीं; गावांत दुसरीकडे कोठें ओळख नाहीं व नुक्तीच नोकरी गेलेली, अशा स्थितींत त्या खेडेगांवांत दिवस काढणें त्यांना शक्य नव्हतें. तेव्हां शेजारच्या मोठ्या शहरांत जावें, तेथें कोणाचीना कोणाची तरी नोकरी — निदान शाळामास्तरची तरी — मिळेल ह्या आशेनें ते ह्या शहरांत पोट भरावयास आले होते. सुदैवानें एका

शाळेंत त्यांना शाळामास्तराची नोकरी मिळाली. आरंभीं पगार थोडाच होता, तरी पुढें तो वाढण्याचाही संभव होता. शिवाय एक दोन शिकवण्याही त्यांना मिळाल्या. श्रीधरपंत हुशार होते व त्यांचा स्वभाव काटकसरी होता. त्यामुळें त्यांनीं हळुहळू शिल्लक टाकण्यास सुरुवात केली.

ह्यानंतर कांहीं वर्षें त्या कुटुंबाचे दिवस मोठ्या सुखांत गेले. एका लहानशाच पण टुमदार अशा घरांत ते भाड्यानें राहत होते. मुलाबाळांकरितां किंवा संकटकाळीं, किंवा पुढची तरतूद म्हणून, पैसा जितका उपयोगी पडतो तितका दुसऱ्या कशाचाही उपयोग होत नाहीं ह्याची जाणीव श्रीधरपंतांना पूर्णपणें होती. त्यांना इतर आप्तेष्ट वगैरे कोणीच नव्हते. त्यामुळें शक्य तितका पैसा ते शिलकींत टाकत होते. परंतु ती शिल्लक कांहीं विशेष नव्हती. कारण गरीब शाळामास्तराला पगार तो कितीसा मिळणार ? त्यांना दोन तीन शिकवण्या मिळाल्या होत्या म्हणूनच निभावलें व थोडीबहुत तरी शिल्लक राहिली. असो. अशाप्रकारें कांहीं वर्षें त्यांचीं फार सुखांत गेलीं.

पण, सुखाच्या पाठीमागें दुःखेंही येतात—ह्या म्हणीप्रमाणेंच कीं काय कोण जाणे, श्रीधरपंतांवर दुर्दैवानें एक आपत्ति आली व त्यांचे सुखाचे दिवस संपले.

एके दिवशीं संध्याकाळीं शाळेंतून घरीं परत येत असतां त्यांचें डोकें किंचित् जड झाल्यासारखें वाटून घरीं आल्यावर त्यांना थोडी हुडहुडी भरल्यासारखें झालें. दुसऱ्या दिवशींही हाच प्रकार. ‘ असेल झालं एरव्हींच ! कामाच्या दगदगीनें ’ असें म्हणून त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें, कांहीं औषध घेतलें नाहीं व नेहमींप्रमाणेंच पहांटेची गार पाण्याची आंघोळ चालू ठेविली ! ह्या सर्वांचा परिणाम होऊन आणखी तीन-चार दिवसांनीं त्यांना एकाएकीं चांगलाच ताप भरला व पुढें तें दुखणें विकोपास गेलें. जवळ जवळ एक महिनाभर श्रीधरपंत अंथरुणावर अगदीं खिळून होते. तो विषमाचाच भयंकर ताप होता.

मथुराबाई अहोरात्र त्यांची कसोशीनें शुश्रूषा करीत होत्या म्हणूनच ते ह्या दुखण्यांतून वांचले असें म्हणावयास हरकत नाहीं. डॉक्टरची फी, पथ्यपाणी, वगैरेकरितां फार खर्च झाला. इतके दिवस काटकसर करून शिल्लक टाकलेले सर्व पैसे पार खर्च होऊन गेले. शिवाय, आजारीपणामुळें एक महिना रजा काढावी लागल्यानें श्रीधरपंतांचा एक महिन्याचा पगारही बुडाला.

दुखण्यांतून बरे झाल्यावर श्रीधरपंत फार अशक्त झाले होते. त्यांच्यानें शाळेंत पहिल्यासारखें काम होईना. आठवड्यांतून एक-दोन दिवस तरी रजा मागणें भाग पडूं लागलें. त्यामुळें शाळेंत त्यांच्याविषयीं कुरकुर होऊं लागून अखेर त्यांना शाळेंतून काढून टाकण्यांत आलें. नोकरी गेली ह्यामुळें एकदम धक्का बसून श्रीधरपंतांचें दुखणें पुन्हा उलटलें. आतां मात्र पैशाची फारच ओढाताण झाली. घरांतील एक दोन जिन्नस मथुराबाईंना विकावे लागले. इतकेंही करून शेवटीं उपयोग कांहींच झाला नाहीं. दुःखानें तळमळत तळमळत सुमारें तीन आठवड्यांनीं श्रीधरपंत वारले व गरीव विचारी मथुराबाई व तिचीं दोन लहान मुलें हीं अगदीं पोरकीं झालीं. त्या स्त्रीवर आकाशाची कुऱ्हाडच कोसळल्याप्रमाणें झालें. पतीच्या मृत्यूनें तिला अतोनात शोक व दुःख झालें. त्यांतून, आपण पुढें ह्या अफाट जगांत कसे दिवस काढावेत ? पैसा तर बिलकूल उरलेला नाहीं. खावें काय ? जगावें कसें ? वगैरे भयानक प्रश्न डोळ्यांपुढें सतत उभे राहून त्या बिचाऱ्या विधवा स्त्रीची मोठी केविलवाणी अवस्था झाली.

तिघांचें पोट भरेल इतके पैसे मिळवितां येतील अशा तऱ्हेचा एखादा उद्योगधंदा किंवा कला तिला येत नव्हती. शिवाय, अशा संकटाच्या वेळीं तिला धीर देऊन मदत करणारा असा कोणीच एखादा आप्तेष्ट किंवा ओळखीचा मनुष्य मथुराबाईस नव्हता. त्या अफाट व भयाण जगांत ती बिचारी अगदींच पोरकी व अनाथ झाली.

ह्यानंतर मात्र गरिबीमुळें पुढील दिवस काढणें मथुराबाईला फारच कठीण पडूं लागलें. त्यांची उपासमार होऊं लागली. खरोखर, ह्या जगांत गरीब लोकांचा जीवनकलह फार तीव्र व खडतर असतो. येईल त्या संकटाचा मोठ्या नेटानें प्रतिकार करीत खंबीर अंत:करणाची मथुराबाई मोठ्या मुष्किलीनें दिवस काढीत होती. पहिली भाड्याची छोटी व टुमदार जागा तिला केव्हांच सोडावी लागली. ह्यानंतर दुसऱ्या एका कमी भाड्याच्या जागीं तिनें आपलें बिऱ्हाड हलविलें, तरी देखील तेवढें भाडें देणें त्या गरीब कुटुंबाला परवडत नव्हतें. त्याहूनही कमी भाड्याची दुसरी जागा त्यांना शोधावी लागली. असें होतां होतां अखेरीस सर्वांत कमी भाड्याच्या जागीं, म्हणजे वर सांगितलेल्या त्या अरुंद बोळांतील घाणेरड्या जागीं राहणें त्या गरीब बिचाऱ्या मुलांना व दुर्दैवी मथुराबाईंना भाग पडलें.

घरांत पैसे मिळविणारा असा दुसरा कोणीच उरलेला नव्हता. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या लहान मुलांचे कपडे मधून मधून शिवून देऊन मथुराबाई थोडेबहुत पैसे मिळवीत. पण तेवढ्यानें कसें भागणार? गोपू अजून लहान होता. एखादा कामधंदा करून थोडेसे तरी पैसे मिळविण्याइतकें त्याचें वय अजून झालेलें नव्हतें. अशा स्थितींत आणखी एक दोन वर्षें मथुराबाईंना फारच हालअपेष्टांत काढावीं लागलीं. अन्न मिळविण्याकरितां गोपूला मधून मधून मधुकरीही मागावी लागत होती. गोपूचें वय ह्या वेळीं सुमारें बारा वर्षांचें होतें. तो सध्या म्युनिसिपल शाळेंत मराठी चौथींत होता. आपल्या मुलास पुढें इंग्रजी शिक्षण देण्याची मथुराबाईंची फार इच्छा होती. पण तें जमणें जवळ जवळ अशक्यच होतें. कारण इंग्रजी शाळेची मोठी फी कोण देणार?

आपण थोडेबहुत तरी पैसे (स्वतंत्रपणें) मिळवून आईला मदत करावी अशी गोपूचीही फार इच्छा होती. पण अशा अनोळखी मुलास कोण कामावर ठेवणार? शिवाय गोपूचे कपडेही ठिगळें जोडलेले, जुने व घाणेरडे असें दिसून येत असल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं त्याचा

अपमान होई व त्याला सर्वजण झिडकारून लावीत. गरिबीमुळें आपणास त्यापुढें शिक्षण घेतां येणार नाहीं असें गोपूच्या हल्लीं ध्यानांत येऊं लागलें होतें. कोठें ना कोठें तरी एखादी लहानशी नोकरी मिळावी, काम लागावें असे त्या पोरालाही वाटूं लागलें.

संध्याकाळीं तो अनाथ व अनोळखी मुलगा वणवण करीत शहरांत हिंडून एखादें काम मिळतें किंवा नाहीं हें पाहूं लागला! वाण्याच्या एक दोन दुकानीं, कापडाच्या एका मोठ्या स्टोअर्समध्यें, पुस्तकें विकणाऱ्याच्या दुकानीं, सुतारकामाच्या कारखान्यामध्यें, वगैरे नाना ठिकाणीं, "मला कामावर ठेवतां? नोकरी देतां?" असें त्या मुलानें विचारलें. पण प्रत्येक ठिकाणीं त्याचा अपमान झाला. लोक त्याला हसले व त्याच्या एकंदर घाणेरड्या पोषाखाकडे पाहून त्याला धुडकावून लावण्यांत आलें. एक दोन 'विश्रांतिभुवनांत' कपबशा विसळणाऱ्या बॉयचें (मुलाचें) काम मिळालें तर पाहावें म्हणून त्या गरीब मुलानें एक दोन विश्रांतिभुवनांच्या मालकांनाही विचारून पाहिलें, पण तेथें देखील त्याची थट्टाच झाली. गोपूचा स्वभाव फार मानी होता. निष्कारण अपमान व थट्टा झालेली पाहून त्याला अतोनात वाईट वाटून त्याचें मन फार खिन्न झालें. तो विचारा लहान मुलगा निराश होत चालला. रोज रोज पाय दुखून येईपर्यंत भटकावें, कोठेंही नोकरी मिळूं नये व अखेरीस दमून भागून, अपमान मुकाट्यानें गिळून टाकून निराशेनें रात्रीं घरीं परतावें असा गोपूचा कार्यक्रम बरेच दिवस होता.

मोठमोठ्या शहरांतून'तर हीच गंमत असते. तिऱ्हाइतास असें वाटत असतें कीं शहरांतील प्रत्येक माणसास कांहीं तरी कामधंदा असतोच व त्याच्या खिशांत पैसे खेळत असतात. प्रत्येकजणाचा पोषाख दुसऱ्यापेक्षां मोठा छानछोकीचा दिसून येतो. परंतु अशा त्या शहरांत एका शाळा-मास्तरच्या गरीब विचाऱ्या मुलास कोठेंही हलकी सलकी देखील नोकरी किंवा काम मिळूं नये व रस्तोरस्तीं वणवण करीत फिरणें भाग पडावें, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे खरी! मोठमोठ्या शहरीं असेंच असतें. कांहीं

लोक अत्यंत श्रीमान् तर कांहींना खावयास देखील मिळूं नये! अशी विषमता व कृत्रिमता प्रत्येक शहरांत दिसून येते ही गोष्ट अगदीं खरी आहे. बिचाऱ्या मथुराबाईसारखी गरीब पण सद्गुणी व सुशील अशीं किती तरी कुटुंबें त्या शहरांत मोठ्या हालअपेष्टांत दिवस काढीत असतील!

नोकरी किंवा काम मिळत नाहीं, तेव्हां स्वतंत्रपणें असें आपणास कांहीं करतां येईल किंवा नाहीं ह्याविषयीं तो विचार करूं लागला. ज्ञानप्रकाश—केसरी—नवाकाळ—वगैरे वर्तमानपत्रें विकणाऱ्या मुलांप्रमाणें आपण केलें तर? असा विचार त्याच्या मनांत आला. तेव्हां त्यानें वर्तमानपत्रें विकणाऱ्या एका मुलास त्यासंबंधीं विचारलें. पण तो मुलगा म्हणाला कीं ज्याकडून आम्ही वर्तमानपत्रें घेतों त्या एजंटाकडे प्रथम १० रुपये अनामत म्हणून ठेवावे लागतात. आपण १० रुपये कोठून आणणार? तेव्हां खिन्न होऊन गोपूनें तोही नाद सोडून दिला. त्याच दिवशीं संध्याकाळीं कापूर, उदबत्ती, काड्याच्या पेट्या वगैरे जिनसा विकणाऱ्या दोन मुलांचें भाषण गोपूच्या कानांवर आलें. विक्री किती झाली, निव्वळ नफा किती पडला, वगैरेसंबंधीं तीं दोन मुलें आपापसांत बोलत होतीं.

तें ऐकून गोपूनें आपल्या मनाशीं ठरविलें कीं आपणही संध्याकाळीं हाच धंदा करावा. भांडवलही अगदींच थोडें लागतें व नफा थोडा जरी म्हटला, तरी ३—४ आणे सहज पडेल. बस् झालें. तेवढीच घरीं मदत होईल. शिवाय स्वतंत्र धंदा. कोणाचीं बोलणीं खावयास नकोत. अपमानही सहन करावा लागणार नाहीं. शाळा सुटली कीं थोड्या वेळानें संध्याकाळीं आपण कापूर—उदबत्ती विकत रस्त्यावरून हिंडावें व रात्रीं घरीं यावें—गोपूचा ठाम निश्चय झाला.

त्यानें आपला विचार आईस कळविला. हें ऐकून मथुराबाईला प्रथम कसेंसेंच वाटलें. त्या म्हणाल्या, "छे! छे! छे! गोपू, तुझ्यासारख्या मुलास हा असला हलकासलका धंदा करतां कामा नये. त्या हलकट मुलांप्रमाणें तूं रस्तोरस्तीं ओरडत फिरणार?" आपल्या एकुलत्या एक

मुलाच्या मनांत हा असला हीनपणाचा धंदा करावयाचें आलें आहे ही गोष्ट तिला आवडली नाहीं. ती प्रथम गोंधळून गेली. तिच्या मनाला फार त्रास झाला. परंतु पुन्हा विचार केल्यावर तिनें गोपूस तशी परवानगी मोठ्या नाखुषीनें दिली. कारण त्याला दुसरा कामधंदा मिळत नाहीं हें तर स्पष्ट होतें. गरिबीमुळें व निराशेनें वैतागून त्या लहान मुलाच्या हातून एखादें वाईट कृत्य घडण्याची तिला थोडी भीति होती. शिवाय, सध्यां त्यांना पैशाची फारच नड होती. त्यांची उपासमार चाललेली होती. थोडे का होईना, पण स्वतंत्रपणें गोपूला जर पैसे मिळाले तर ती गोष्टही तिला कांहीं वावगी दिसली नाहीं. मुलाच्या लहान वयाकडे पाहून तिला खिन्नता वाटे. पण करणार काय? गरिबी आड येत होती. दूरवर विचार करून मथुराबाईनीं अखेर गोपूच्या म्हणण्यास मोठ्या नाखुषीनेंच संमती दिली.

आईची परवानगी मिळाली म्हणून गोपूसही बरें वाटलें. घरांतील जुन्या कापडाची एक लांबोडकी पिशवी त्यानें आईजवळून शिवून घेतली व आईजवळून थोडे पैसे घेऊन कापराच्या डब्या, उदबत्तीचे पुडे, गंधाचे रवे, काड्याच्या पेट्या वगैरे जिनसा त्यानें खरेदी केल्या. दुसऱ्या दिवसापासून त्या जिनसा विकीत तो रस्त्यावरून फिरूं लागला.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं सामानाची ती पिशवी खांद्यावर टाकून "कापूर उदबत्ती, सुवासिक अगरबत्ती" असें ओरडत रस्त्यावरून हिंडून तो आपल्या मालाची विक्री करूं लागला. पहिल्या दिवशीं त्याला मनांत प्रथम थोडी लाज वाटली, पण विक्री चांगली होईल अशीही आशा त्याच्या मनांत उत्पन्न झाली होती. हळुहळू पहिलें एक गिऱ्हाईक त्याला मिळालें. नंतर दुसरें आलें. अशा तऱ्हेनें त्याची विक्री व्हावयास लागून गोपूची भीड बरीच कमी झाली. प्रथम त्याला असें वाटलें कीं रस्त्यावरील व दुकानांतील आणि आसपासच्या घरांतील लोक आपणाकडेच

निरखून पाहत आहेत ! " कापूर उदबत्ती " असें खणखणीत आवाजांत ओरडत हिंडणाऱ्या त्या चलाख मुलाकडे गिऱ्हाइकाचें झट्दिशीं लक्ष जाई.

रात्र झाल्यावर त्यानें आपली किती विक्री झाली तें मोजून पाहिलें. ७ आणे ! वः ! पहिल्या दिवसाच्या मानानें कांहीं वाईट नाहीं.

मुलगा थोडेसे पैसे मिळवून घरीं आला तेव्हा त्याच्या आईला थोडा तरी आनंद झाल्याखेरीज राहिला नाहीं. त्या दिवशीं त्यांच्या घरांत खरोखरच कांहींच खावयास उरलें नव्हतें. लहानग्या शांतीनें तर खाऊसाठीं फारच हट्ट धरला असून ती रडत होती. अशा वेळीं गोपूचे पैसे त्यांना फार उपयोगी पडले.

उदरनिर्वाह चालावा म्हणून आपल्या मुलानें असा हलका उद्योग करावा हें मथुराबाईंना मनापासून बिलकुल आवडत नव्हतें. परंतु त्या धंद्यांत सुद्धा मुलानें प्रामाणिकपणा व सचोटी राखली तर खरोखरच पुढें-मागें त्याला चांगली स्थिति येईल अशी एक तऱ्हेची अंधुक आशा त्यांना वाटत होती.

कापूर-उदबत्ती विकणाऱ्या फेरीवाल्याचा उद्योग सुरू केल्यास गोपूला आतां एक महिना होऊन गेला होता. त्याची भीड पार चेपून गेली होती. रस्त्यावरील इतर मुलांपेक्षां जास्तच खणखणीत आवाजांत " कापूर-उदबत्ती, सुवासिक अगरबत्ती " असें हुशारीनें ओरडत फिरण्याची त्याला चांगलीच संवय झाली. त्या दिवशीं रात्रीं चुकीनें पैसा समजून रुपया देणारे सद्गृहस्थ ( भगवंतराव ) गोपूला भेटले, त्याच्या आधीं सरासरी एक महिन्यापूर्वीपासून गोपूनें ' विक्री ' करणाऱ्या मुलाचा धंदा सुरू केला होता.

गोपूचे आईबाप खरोखरच फार सद्गुणी व सुशील होते. चांगली व खरी गोष्ट असेल तसें करण्याचा व प्रामाणिकपणानें नेहमीं वागण्याचा त्यांनीं आपल्या स्वतःच्या शुद्धाचरणानें व कृतीनें आणि शब्दांनीं आपल्या

3695

लहान मुलांना धडा घालून दिलेला होता. रात्रीचें गरिबीचें जेवणखाण झाल्यावर आपल्या दोन मुलांसह समईपाशीं बसून ती विचारी विधवा गोपूस आणि शांतीस पुष्कळ वेळां सांगे, "माझ्या लाडक्या मुलांनो, नेहमीं खरें बोला. जें तुमचें नसेल तें कधींही घेऊं नका. फसविण्यापासून किंवा चोरी करण्यापासून किंवा खोटें बोलण्यापासून कधींही चांगलें व्हावयाचें नाहीं. शिवाय असें करणें म्हणजे एक मोठें पाप आहे. मनुष्यानें पाप केलें म्हणजे त्याला स्वतःला त्रास झाल्याखेरीज राहत नाहीं.

मुलें आपल्या उपदेशाविरुद्ध वागणार नाहींत असा तिला भरंवसा होता. असें असल्यामुळें त्या रात्रीं गोपूनें 'तो रुपया' आणलेला पाहून ती दचकल्यासारखी झाली ह्यांत विशेष आश्चर्य नाहीं.

गरिबीमुळें किंवा एखाद्या वाईट सोबत्याच्या संगतीनें गोपूनें कांहीं तरी वाईट कृत्य करून तो रुपया मिळविला असावा अशी तिला प्रथम शंका येऊन तिच्या मनाला फार दुःख झालें व त्यामुळेंच ती गोपूला वर सांगितल्याप्रमाणें बोलली.

जेवण झटपट उरकून थोडा अभ्यास करून गोपू झोपीं गेला. लहानगी शांती केव्हांच निजली होती.

दुसरा दिवस उजाडला. तेव्हां त्या 'चुकीच्या रुपया' संबंधीं पुन्हा बोलणें सुरू झालें. गोपूचें मत अजून पहिल्यासारखेंच होतें. "तो रुपया आपण खुशाल ठेवून घ्यावा, त्यापासून कोणासही इजा होणार नाहीं," असेंच गोपू म्हणत होता. मथुराबाईनें निक्षून सांगितलें, "नाहीं. गोपू, तसें करतां कामा नये. तो रुपया आपला नाहीं. आणि जोंपर्यंत त्या गृहस्थांच्या मनांत हा रुपया खरोखर तुलाच द्यावयाचा होता— नजरचुकीनें नव्हे —असें सिद्ध झालेलें नाहीं, तोंपर्यंत हा रुपया आपणांस ठेवून घेण्याचा अधिकार नाहीं. हा रुपया मी तुलाच देत आहें असें जेव्हां ते गृहस्थ स्वतः सांगतील तेव्हांच तो तुला घेतां येईल."

" पण " आग्रहानें गोपू म्हणाला, " आई, आपण किती गरीब आहोंत ? त्या गृहस्थापेक्षां आपणासच ह्या रुपयाची जास्त गरज आहे ह्यांत तर बिलकुल शंका नाहीं. "

" होय. आपण फार गरीब आहोंत. हें सर्व खरें. गोपू, तूं हल्लीं जे थोडेबहुत पैसे मिळवीत आहेस ते जर तुला मिळत नसते तर आपली उपासमार होण्याची कदाचित् वेळ आली असती असेंही मला वाटतें. " मथुराबाई म्हणाल्या, " पण, आपण गरीब आहोंत ह्या सबबीवर जें आपलें नव्हे, दुसऱ्याचें आहे तें घेण्याचा किंवा वापरण्याचा आपणास हक्क पोंचत नाहीं. अशी कल्पना कर कीं आपणाहूनही जास्त गरीब असलेल्या एखाद्यानें नजरचुकीनें तुला हा दिला असता, तर तो ठेवून घेणें बरोबर आहे असें तुला वाटलें असतें काय ?

" छट् ! कधींच नाहीं. " प्रौढ माणसाप्रमाणें गोपू गंभीरपणें म्हणाला, " तसें करणें म्हणजे एक लबाडीची व दुष्टाव्याची गोष्ट झाली असती. "

" शाबास तर मग गोपू, चुकीनें तुला रुपया देणारे ते सद्गृहस्थ आपणांहून श्रीमंत आहेत एवढ्यावरून हा रुपया आपला म्हणतां येईल ? " त्याच्या आईनें विचारलें.

" नाहीं. " मुलानें चट्दिशीं उत्तर दिलें, " मला तसें वाटत नाहीं. "

" तेव्हां " त्याच्या आईनें उत्तर केलें " आज संध्याकाळीं हा रुपया तूं बरोबर घेऊन जा व ज्यांनीं तुला नजरचुकीनें दिला ते गृहस्थ दिसतांच त्यांना परत देऊन टाक. नजरचुकीनें मिळालेला रुपया ताबडतोब त्याच वेळीं तूं परत कां केला नाहींस ह्याचीही खरी हकीकत माझ्याप्रमाणेंच त्यांनाही सांग. त्या गृहस्थांनीं हा तुलाच देऊन टाकला तर मग मात्र ह्यावर आपलाच हक्क होईल आणि खरोखर मग त्या रुपयाचा आपणास बराच उपयोग होईल. "

"पण आई, मला जर ते गृहस्थ आढळले नाहींत," एक तऱ्हेची आशा उत्पन्न होऊन गोपू म्हणाला, "तर मग ह्याचें आपण काय करावयाचें ?"

"माझ्या मुला, तूं प्रयत्न कर व त्या गृहस्थांना शोधून काढ." गोपूला उत्तर मिळालें, "त्या कामीं तुला यश आलें नाहीं तर मला जें करतां येणें शक्य असेल तें मी करीन.

---

# प्रकरण तिसरें

त्रासिक मुद्रेनें तो रुपया मोठ्या नाखुषीनें खिशांत टाकून गोपू घराबाहेर पडला. खरें सांगावयाचें म्हणजे, ह्याचा धनी आपणास कधींच दिसूं नये – अशीच तो जवळजवळ इच्छा करीत होता. इतकेंही असलें, तरी तो धनी शोधण्याचा शक्य तितका प्रयत्न करून रुपया त्याच्या हवालीं करण्याचें किंवा परत देऊन टाकण्याचें मात्र त्यानें मनाशीं ठरविलें होतें. लबाडी किंवा अप्रामाणिकपणें वागण्याचा विचार त्याच्या मनांत एक क्षणभर देखील आला नाहीं.

मंडईच्या रस्त्याकडे तो धावत धावत निघाला. रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक माणसाकडे तो लक्षपूर्वक पाहत होता. पुष्कळ वेळ होऊन गेला, तरी ज्या रुपयामुळें घरांत इतकीं बोलणीं झालीं तो रुपया देणाऱ्याचा चेहेरा कांहीं गोपूला दिसला नाहीं.

गोपूलाही तो दिवस फार वाईट गेला. नाना तऱ्हेच्या अशा शंका-कुशंकांनीं त्याला भंडावून सोडिलें. तो गृहस्थ आपल्यासमोरून जाईल व मग आपण त्या रुपयाच्या कटकटींतून एकदाचे सुटूं अशी त्याला प्रथम आशा वाटत होती. पण नंतर, तसें कांहीं एक न करण्याचा विचार

त्याच्या मनांत आला. कारण, तो रुपया परत करण्याची कल्पना त्याला विलकुल पसंत पडेना.

एकदा तो गृहस्थ दिसला असा भास होऊन गोपू पुढें धावला, पण इतक्यांत दुसरें एक गिऱ्हाईक आड आलें म्हणून गोपू मागें वळला. गोपूजवळून कांहीं माल घ्यावयाचा त्याच्या मनांत होता, पण सौदा न पटून तें लगेच चालतें झालें. त्यामुळें गोपू रागावला व जास्त त्रासून गेला.

" हा रुपया त्या गृहस्थांच्या खिशांतच राहता तर फार चांगलें झालें असतें " गोपू मनाशीं म्हणाला, " आणि तांब्याच्या दिडक्या ज्या खिशांत आहेत, त्याच खिशांत त्यानें चांदीचें नाणें कां ठेवावें ? दिडक्यांबरोबर रुपया गमावण्याची त्याची इच्छा असली पाहिजे. " गोपू पुटपुटला, विचार करीत नाना तऱ्हेच्या सबवी शोधून काढूं लागला ! कसेंही करून तो रुपया आपणाजवळून जाऊं देऊं नये ह्या हेतूनें तो नाना तऱ्हेच्या सबवी आठवूं लागला. पण एकामागून एक त्या सर्व सबवी निष्फळच ठरत होत्या.

दुसऱ्याही एका गोष्टीमुळें त्याच्या मनाला त्रास होत होता. नेहमींपेक्षां त्या दिवशीं त्याची विक्री फारच कमी झाली. गोपू हा लहान मुलगा होता हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. त्यामुळें रात्रीं तो घरीं परत आला, तेव्हां फार हिरमुसला होऊन त्याची मुद्रा खिन्न झालेली होती ह्यांत मोठें नवल नाहीं.

त्याची बहीण शांता हिलाही त्या रुपयासंबंधीं गोपूप्रमाणेंच वाटत होतें. दरवाजा लोटून तो आंत येतांच शांता एकदम ओरडली, " गोपूदादा, तुला ते दिसले ? "

" कोण दिसले ? " गोपूनें किंचित् रागानेंच विचारलें.

" हें रे काय, जसें कांहीं माहीतच नाहीं ! काल तुला ज्यानें रुपया दिला तो गृहस्थ ? " शांता म्हणाली.

"त्यानें मला दिलेला नाहीं. खरोखर दिला असता तर किती बहार उडाली असती ! निदान त्या गृहस्थाच्या तोंडून तसे शब्द बाहेर यावयास पाहिजे होते. मग शांते, तुला ह्या दिवाळीला फटाके आणतां आले असते."

"एकूण गोपू, तुला तो गृहस्थ आढळला म्हणावयाचा?" तीं दोन मुलें कशासंबंधीं बोलत आहेत हें नीट न कळल्यामुळें त्यांची आई म्हणाली.

"नाहीं," गोपू म्हणाला, "आई, मीं पुष्कळ लक्ष ठेवलें पण ते सद्गृहस्थ त्या रस्त्यावरून जातांना मला दिसले नाहींत."

"तर मग आई," शांती ओरडली, "तो रुपया आतां आपलाच झाला म्हणावयाचा.

"नाहीं. माझ्या सोनुकले," तिच्या आईनें उत्तर दिलें, "सकाळीं हा आपला नव्हता. त्याचप्रमाणें आतांही नाहीं."

"तर मग आतां मी करूं तरी काय?" थोडाबहुत निराश होऊन त्या छोट्या फेरीवाल्यानें चौकशी केली.

"आज जसें केलेंस तसाच उद्यांही प्रयत्न करून पाहा. पहिल्याच दिवशीं रुपयाचा तो धनी सांपडला नाहीं म्हणून आपणांस निराश होतां कामा नये. आज नाहीं उद्यां, केव्हां तरी तो गृहस्थ त्या रस्त्यावरून जाईलच आणि तुझ्या नजरेस पडेल. तेव्हां गोपू, 'पुन्हा यत्न करून पाहा' ह्या म्हणीप्रमाणें तुला वागलें पाहिजे." गोपूच्या प्रश्नास मथुराबाईनीं हें उत्तर दिलें.

हें ऐकून गोपू आणि शांता पुढें कांहींच बोललीं नाहींत. कारण त्याचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं, हें त्यांना माहीत होतें. आईचें म्हणणें रास्त आहे असें त्यांना जरी वाटत होतें, तरी पण पैशाची फार नड असतांना देखील हातांत अनायासानें आलेला रुपया आपणास खर्च करतां येऊं नये ह्या गोष्टीमुळें त्या मुलांना फार वाईट वाटत होतें. दिवाळी अगदीं जवळ (दोन दिवसांवर) आली होती. त्या रुपयाचे किती तरी फटाके आणतां आले असते. तो रुपया खर्चावयास मिळत नाहीं तो नाहींच, उलट तो ज्याचा त्यास परत करण्याच्या कामीं सुद्धा इतकी दगदग करावी लागत आहे आणि अडथळे येत आहेत हें पाहून त्या मुलांच्या मनाला

फार त्रास होऊं लागला व त्यांना कांहीं सुचेनासें झालें. रात्रीं झोंप लागेपर्यंत त्यांची तळमळ सुरू होतीच. अखेर गाढ झोंप लागल्यावरच त्यांच्या मनाला विश्रांति मिळाली.

दुसऱ्या दिवशींही गोपूची विक्री कमीच झाली. रुपयाचा धनी 'तो गृहस्थ' त्याला दिसला नाहीं. ह्यापुढें तो गृहस्थ आपणांस दिसूंच नये अशी गोपूस फारच इच्छा वाटूं लागली. कारण तसें झालें म्हणजे तो रुपया त्यांचाच होणार होता. दिवाळी एकच दिवसावर आलेली होती, त्यामुळें गोपूचें मन फार अस्वस्थ झालें. रात्रीं घरीं आल्यावर त्यानें आईस सर्व सांगितलें. अजून त्या गृहस्थाचा पत्ता लागत नाहीं हें पाहून मथुराबाईंना चिंता वाटूं लागली. मुलें तर निराशच झालीं होतीं.

दुसरा दिवस उजाडला. गोपू सकाळींच घराबाहेर पडला. "आई," जातेवेळेस तो म्हणाला, "हा रुपया म्हणजे माझ्या अंगावर एक फार मोठें ओझेंच आहे, असें मला वाटतें. त्यामुळें मला हुशारी वाटत नाहीं व माझ्या हातून नेहमींच्या निम्म्यानें देखील विक्रीचे काम सुरळीत होत नाहीं. जोंपर्यंत हा रुपया माझ्या खिशांत आहे तोंपर्यंत माझें सगळें लक्ष ह्याच्याकडेच लागतें. हा द्वाड रुपया माझ्या कधींच नजरेस पडला नसता तर फार बरें झालें असतें."

"माझ्या लाडक्या मुला, ह्या रुपयामुळें तुला माझ्याप्रमाणेंच फार त्रास होतो आहे हें मी जाणतें. पण थोडा धीर धर. निराश होऊं नकोस. कोणाच्याही मोहास बळी पडून आपणांस प्रामाणिकपणा सोडतां कामा नये. ह्या सर्व प्रकारांतूनच शेवटीं फायदा होऊन तुझें नशीब उदयास येणार आहे असें माझ्या अंत:करणाला आतां फार फार वाटूं लागलें आहे. असें कां वाटूं लागलें आहे हें मात्र मला सांगतां येत नाहीं. पण तसें वाटतें आहे हें मात्र खरें. गोपू, तूं फार शाहाणा व आज्ञाधारक मुलगा आहेस. जा आतां व रस्त्यावरून नीट लक्ष ठेवून मोठ्या नेटानें प्रयत्न कर." मथुराबाई म्हणाल्या.

कांहीं एक न बोलतां गोपू तडक बाहेर पडला. पण त्याची निराशाच झाली. सकाळीं 'तो गृहस्थ' गोपूला दिसला नाहीं. संध्याकाळीं मात्र गोपूचें मन फारच अस्थिर झालें. कारण दुसऱ्या दिवशीं दिवाळीचा पहिला, म्हणजे नरकचतुर्दशीचा दिवस होता.

"पहांटेस बाकीच्या घरांतील सर्व लहान मुलें स्नान करून फटाके वगैरे वाजवून करमणूक करतील. गरिबीमुळें आपणांस मात्र कांहींच करतां येणार नाहीं किंवा कांहींही विकत घेतां येणार नाहीं. हा रुपया जर आपलाच असता तर शांतेकरितां थोडासा खाऊ, फटाके, वगैरे नसते विकत घेतां आले?" इत्यादि विचार सारखे मनांत येऊन तो मुलगा फार कष्टी झाला व संध्याकाळीं बाहेर पडतांना थोड्या रागारागानेंच तो आईस म्हणाला, "आई, मी आज शेवटचा प्रयत्न करणार. आज जर ते गृहस्थ मला आढळले नाहींत, तर मी हा त्रासदायक रुपया खुशाल गटारांत भिरकावून देईन व कटकटींतून मोकळा होईन. इतःपर माझ्याच्यानें हें सहन होणार नाहीं."

मथुराबाई कांहींच बोलली नाहीं. काय बोलणार बिचारी! त्या रुपयामुळें आपल्या गरीब बिचाऱ्या मुलाच्या मनावर केवढें जबरदस्त दडपण पडलें आहे, हें ती पूर्णपणें जाणून होती. आपल्या मुलाची कांहीं एक चुकी नसतांना त्याला इतका त्रास निमुटपणें सहन करावा लागत आहे हें पाहून तिलाही वाईट वाटत होतेंच.

घराबाहेर पडतांच गोपू तडक मंडईच्या रस्त्यावर गेला व "कापूर उदबत्ती, सुवासिक अगरबत्ती" असें ओरडत हिंडू लागला व येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडे नीट लक्ष ठेवूं लागला.

नेहमींप्रमाणें त्याची मुद्राही उत्साही दिसून येत नव्हती किंवा आवाजही खणखणीत येत नव्हता. होतां होतां संध्याकाळचे पांच वाजून गेले.

एका गिऱ्हाइकास काड्याच्या पेटीचें डझन देऊन तें गिऱ्हाइक निघून गेल्यावर पैसे मोजून खिशांत टाकल्यावर गोपूनें मान वर केली व दुसरें कोणी गिऱ्हाइक येतें किंवा काय हें पाहूं लागला. तों काय सांगावें ? ह्या दोन तीन दिवस ज्या गृहस्थाची तो काळजीपूर्वक वाट पाहत होता, तो गृहस्थ नुक्ताच शेजारून गेलेला त्याला दिसला. पाठमोरा असल्यामुळें त्या माणसाचा चेहेरा कांहीं गोपूला दिसला नाहीं. परंतु त्याचा कोट आणि फेटा त्या रुपयाच्या धन्याप्रमाणेंच होता. उंचीनेंही तो मनुष्य तितकाच होता. छे ! बिलकुल शंका नाहीं. इतका वेळ ज्यांची आपण वाट पाहत होतों तेच ते सद्गृहस्थ असले पाहिजेत असें गोपूस वाटलें. ताबडतोब गोपू धावत सुटला. एकदाचे ह्या रुपयाच्या भानगडींतून सुटूं म्हणून त्याला एक तऱ्हेचा विलक्षण आनंद होत होता.

तो गृहस्थ घाईघाईनें पुढेंच चालला होता. तेव्हां गोपूनें मोठ्यानें म्हटलें, "थांबा, थांबा रावसाहेब." आपणास कोणी हांक मारीत आहे अशी शंका येऊन त्या गृहस्थानें पाठीमागें वळून पाहिलें.

त्या माणसाचा चेहरा दिसतांक्षणींच गोपूनें ओळखलें कीं ज्यांस आपण शोधण्याचा प्रयत्न करीत आहोंत तेच हे गृहस्थ. ताबडतोब धावत त्यांच्या अगदीं शेजारीं जाऊन गोपू घाईघाईनें म्हणाला, गोपूच्या मनांत फार खळबळ उडालेली होती, त्यामुळें स्फोट व्हावा त्याप्रमाणें गोपूच्या तोंडून एकदम शब्द बाहेर पडले.

"रावसाहेब, तुमचे कांहीं पैसे हरवले आहेत ?" खिशांतील रुपया काढून गोपूनें त्यांना विचारलें.

"छे ! पोऱ्या" भगवंतरावांनीं उत्तर केलें. ते गृहस्थ म्हणजे खुद्द भगवंतरावच होते. "निदान मला तरी तसें वाटत नाहीं" ते पुढें म्हणाले व खिशांत हात घालून चाचपूं लागले.

"रावसाहेब, आत्तां मी म्हणत नाहीं. पण तीन दिवसांपूर्वीं ?"

" खरेंच ! बरी आठवण झाली तुझ्या बोलण्यानें. " भगवंतराव म्हणाले, " माझा एक रुपया कमी झाला होता खरा; पण तो कसा हरवला ह्याचा मला बरोबर बिलकुल तर्कच करतां येईना. "

" पण रावसाहेब, मी सांगतों तुम्हांला " गोपूनें उत्तर केलें. " त्या दिवशीं कापूर-उदबत्तीचे पुडे मजजवळून घेतल्यावर मला खुर्दा दिलात त्यांत ' हा ' होता. आई म्हणाली कीं नजरचुकीनें तुम्हीं दिला असला पाहिजे. पण रावसाहेब, हा पाहा मजजवळ तो अजून सुरक्षित आहे. तुम्हांस परत द्यावयास सांपडला म्हणून मला फार आनंद होत आहे. " तो रुपया पुढें करून गोपूनें आणखी म्हटलें.

कापूर-उदबत्ती विकणाऱ्या व गडबडीनें बोलणाऱ्या त्या लहान मुलाकडे भगवंतरावांनीं दोन-तीन सेकंद चांगलें नीट निरखून पाहिलें. भगवंतरावांच्या हें लक्षांत आलें, कीं मुलाचे कपडे जुने, ठिगळें जोडलेले, मळकट असून एकंदरीनें पाहिलें असतां हा पोऱ्या फार गरीब दिसतो. परंतु त्याची वागणूक व 'बोलणें वगैरे रस्त्यावर जिन्नस विकणाऱ्या इतर हलकट, मुलांप्रमाणें बिलकुल नाहीं. त्याचे पाणीदार डोळे, तरतरीत प्रामाणिकपणाची मुद्रा व गुटगुटीत शरीर पाहून भगवंतरावांना कौतुक वाटलें. त्या मुलाचें बोलणेंही मोठें नम्र व विनयीपणाचें होतें. त्या गुणामुळेंच मागें भगवंतरावांनीं गोपूजवळूनच कापूर व उदबत्तीचे पुडे घेतलेले होते. ह्या मुलाचा पोषाक जरी अगदीं गरिबीचा असला तरी हा मुलगा मोठा सद्गुणी व हुशार असावा असेंच भगवंतरावांना वाटलें.

" काय रे, छोटा फेरीवाला," ते ममताळूपणें गोपूला म्हणाले, " आणि खरोखरच तूं हा रुपया मला परत देण्याकरितांच इतक्या दिवस राखून ठेवला होतास ? "

" होय रावसाहेब " गोपू म्हणाला, " मीं त्याच वेळीं तुम्हांला परत दिला असता, परंतु तुम्ही निघून गेल्यावर बराच वेळानें त्याच्याकडे माझी नजर गेली. आणि तेव्हांपासून हा तुमचा तुम्हांला परत देऊन

टाकण्याकरितां मी तुम्हांला शोधत होतों. त्या दिवसानंतर आत्तांच तुम्ही माझ्या पुन्हा दृष्टीस पडलांत. "

" साहजिक आहे. मी कसा दिसणार ? त्या दिवशीं रात्रींच मी गांवाला गेलों होतों. आजच दुपारीं परत आलों. " भगवंतराव हसून म्हणाले. ह्या गरीब पोषाकाच्या पोऱ्याविषयीं त्यांना आतां कुतूहल उत्पन्न झालें होतें. " मुला, तुझें नांव काय ? "

" गोपू. "

" तूं कोठें राहतोस ? " त्याला दुसरा प्रश्न विचारण्यांत आला.

गोपू घुटमळला. तो फार मानी स्वभावाचा होता. आपण गरिबीच्या त्या घाणेरड्या जागीं राहत आहोंत हें तिऱ्हाइताला सांगणें त्याला बरें वाटेना. गोपू फार मानी होता. दोन तीन क्षण तो घुटमळला. पण असेंच गप्प बसलों तर चमत्कारिक दिसेल असें लगेच वाटून त्यानें हळूच उत्तर दिलें, " मी, माझी बहीण व आई अशीं तिघेंजण सदावर्त्यांच्या बोळांत राहतों. "

" हा सदावर्त्यांचा बोळ कोठें आहे बुवा ? मीं तर त्याचें अजूनपर्यंत नांवच ऐकलें नव्हतें. " खिशांतून एक टिपण-वही काढीत तो गृहस्थ म्हणाला. गोपूनें त्या बोळाच्या व आपल्या घराच्या खाणाखुणा शक्य तितक्या स्पष्टपणें सांगितल्या व त्या सर्व खाणाखुणा भगवंतरावांनीं आपल्या वहींत काळजीपूर्वक टिपून घेतल्या. गोपू, त्याची आई व बहीण ह्यांच्यासंबंधीं, त्यांनीं गोपूला बरेच प्रश्न केले व माहिती विचारून घेतली. ह्यानंतर, गोपूच्या प्रामाणिकपणाबद्दल स्तुति करून ते पुढें जाण्याकरितां वळले.

" पण रावसाहेब, हा तुमचा रुपया तुम्हीं अजून घेतला नाहींत ! " गोपू म्हणाला.

" नाहीं कसा ? " त्या गृहस्थानें तो रुपया गोपूच्या हातांतून आपल्या हातांत घेतला व एक दोन सेकंदांनीं पुन्हा त्याच्या हातांत परत देऊन ते

म्हणाले, "हा आतां मी तुलाच बक्षीस देत आहें, तेव्हां तो तुझाच झाला. तूं व तुझी आई त्या रुपयाचा चांगला उपयोग कराल अशी माझी खात्री आहे." असें कौतुकानें म्हणून गोपूची पाठ थोपटून तो गृहस्थ घाईघाईनें पुढें निघून गेला. गोपूशीं बोलण्यांत गुंतल्यामुळें त्या गृहस्थाचा थोडा खोळंबा झालेला होता.

---

## प्रकरण चौथें

एकंदर भानगडीचा अशा चांगल्या रीतीनें शेवट झालेला पाहून गोपूस किती आनंद झाला असेल हें तुम्ही कल्पनेनेंच जाणूं शकाल. ही सर्व हकीकत आईस आपण कळविल्यावर तिला किती समाधान होईल व ती आपल्यास कशी शाबासकी देईल, इत्यादि आनंददायक विचारांत गोपू गर्क झाला. गोपूचा आनंद त्याच्या पोटांत मावेना असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण तो खरोखरच रस्त्यावर मजेनें उड्या मारूं लागला. लहान मुलांचें असेंच असतें. मनावरील दडपण दूर झालें म्हणजे तीं अत्यंत आनंदी होतात.

"कापूर-उदबत्ती, सुवासिक अगरबत्ती" असें पुन्हा खणखणीत आवाजांत पहिल्यासारखें ओरडत तो रस्त्यावरून चलाखीनें फिरूं लागला. त्यावेळची त्याची हसरी मुद्रा, चपळाई व सणसणीत स्वर पाहून रस्त्यावरील लोक देखील त्याच्याकडे कौतुकानें मधून मधून पाहूं लागले.

त्याची विक्रीही फार होऊं लागली. इतर मुलांजवळून जिन्नस विकत न घेतां ह्या आनंदी मुलाकडूनच गिऱ्हाईक माल घेऊं लागलें. गोपूची आनंदी मुद्रा व आवाज ह्यांनीं त्यांचीं मनें वेधून घेतलीं होतीं.

माल देतां देतां गोपूचे हात दुखूं लागले. त्याचा खिसा मात्र नेहमींपेक्षां पैशानें जास्त जास्तच जड होऊं लागलेला होता. होतां होतां रात्र झाली. आज विक्री खूप झाली म्हणून गोपूस फार समाधान वाटलें. केव्हां एकदा घरीं जाईन असें त्यास होऊन गेलें. आई आणि शांती समईपाशीं बसलीं असतील. आपण त्यांना आपली हकीकत सांगून एकदम आनंदित व आश्चर्यचकित करून सोडूं अशा मनोरम विचारांत गुंग होऊन गोपू झटझट घरीं यावयास निघाला.

परंतु अखेरीस त्याला स्वतःलाच आश्चर्यचकित होण्याची पाळी आली. त्या अंधेऱ्या बोळकंडींतून झरझर चालत जाऊन गोपू आपल्या बिऱ्हाडापाशीं पोंचला. आनंदाची बातमी घरांत कळविण्यासाठीं तो अत्यंत आतुर झालेला होता. विक्रीचे सर्व पैसे एका हातांत घेऊन दुसऱ्या हातानें खोलीचा दरवाजा घाईघाईनें लोटून तो आंत शिरला व एकदम म्हणाला, “ आई आई हे बघ........” पण दचकून गोपू एकदम थांबला. त्याचें बोलणें अर्धवटच राहिलें. समोरील देखावा पाहून तो विस्मयानें चकित होऊन गेला होता. त्याच्या नजरेस काय पडलें असावें व त्या सर्वांचा अर्थ काय ?

लाकडाचें एक लहानसें स्टूल. स्टुलावर एक कोरा ‘ प्रभाकर कंदील. ’ खालच्या बाजूस एक प्रायमस स्टोव्ह, स्पिरिटची बाटली. पलीकडे दहा बारा पणत्या. पेढेबर्फी, साखरेचीं चित्रें व थोडी फळफळावळ ह्यांनीं भरलेलें एक टोपलें व तीन पितळी डबे—

स्वयंपाकगृहांत गेल्यावर गोपूचें आश्चर्य द्विगुणित झालें. एक कोरी सतरंजी पसरलेली असून पलीकडे एक चटई होती. चूल–बोळकीं वगैरे लहान मुलींचा खेळ चटईवर होता व मुख्य महत्त्वाची गोष्ट म्हणजे, चक्रें, फुलबाजा, नळे, हवईच्या काड्या, चिचुंद्रया, फटाकड्याच्या पेट्या, लवंगी सर, केपाचे डझन, दोन पिस्तुलें, वगैरे दिवाळीच्या फटाक्याच्या

दारूनें भरलेला करंडा होता. शिवाय, शेव, चकली, अनारसे, करंज्या वगैरे फराळाचें सामान एका शिसरांत ठेवलेलें होतें. सतरंजीवर कोऱ्या लुगड्याची एक घडीही होती व दोन गरम पासोड्या पडलेल्या होत्या.

आपण आपल्याच खोलींत आलों आहोंत किंवा हें दुसऱ्याचेंच घर आहे असा गोपूला क्षणमात्र भास झाला. छे! हें घर आपलेंच आहे. गोपूनें पुन्हा डोळे चोळले. मुठींतील पैसे खिशांत कोंबून त्यानें आणखी एकदा डोळे चोळले. छे! हें तर आपलेंच घर आहे. शंकाच नाहीं. कारण समोरच त्याची आई व शांता बसलेलीं होतीं. शांतेला जवळजवळ हर्षवायूच झालेला दिसून येत होता. गोपू गोंधळून गेला. आश्चर्यचकित मुद्रेनें एकदा आईकडे, नंतर शांतेकडे व नंतर त्या नव्या सामानाकडे तो टकमक पाहूं लागला.

मथुराबाईसही अत्यानंद झालेला होता. आनंदानें त्यांचा कंठ अगदीं सद्गदित होऊन गेला असल्याकारणानें त्यांच्या तोंडून शब्द येत नव्हता. त्यांना बोलवत नव्हतें. अखेरीस थोड्या वेळानें गोपूला त्या म्हणाल्या,

"माझ्या लाडक्या मुला, खालीं बस. आधीं जेवण अथवा फराळ करून घे. दिवाळीचीं पक्वान्नें सर्व तयार आहेत."

"आई, हा काय प्रकार घडला आहे? हें सर्व कोणीं केलें?" गोपूच्या तोंडून पहिले शब्द बाहेर पडले.

"देव" मथुराबाई सद्गदित स्वरानें म्हणाल्या. त्यांच्या डोळ्यांत अश्रु आलेले दिसत होते. "भगवानानेंच आपणांस मदत पाठविली आहे."

"कोणीं पाठविली?" गोपूनें पुन्हा विचारिलें. त्याचें आश्चर्य द्विगुणित झालें होतें.

"एका तिऱ्हाइत इसमानें." त्याची आई म्हणाली.

"तो इसम कशा तऱ्हेचा होता?" उत्सुकपणें गोपूनें विचारिलें.

" गोपू, " मथुराबाई थोडी भानावर येऊन म्हणाली, " तूं आधीं आपली कोट-टोपी काढून ठेवून शाहाण्या मुलासारखा शांतपणें बसला राहा. मग मी तुला ती सर्व हकीकत सांगतें. "

गोपू कपडे काढून मुकाट्यानें खालीं बसला व अगदीं स्तब्ध राहून उतावळ्या मुद्रेनें आईकडे निरखून पाहूं लागला.

" ठीक आहे. गोपू, " त्याची आई सांगूं लागली, " त्या वेळीं फारच संध्याकाळ झालेली होती आणि समई देखील लाविलेली नव्हती. त्यामुळें अंधारांत त्या इसमाचा पोषाक कसा होता हें मला बरोबर सांगतां येणार नाहीं. पण मला तर तो देवदूतच वाटला. "

" त्या गृहस्थाच्या अंगांत काळ्या रंगाचा लांब कोट होता ? " हें सर्व सामान कोठून आलें असावें त्याविषयीं एकदम एक विचार येऊन गोपूनें आईस विचारिलें.

" होय. "

" डोक्याला गुलाबी फेटा ? "

" होय. "

" मोठाल्या मिशा होत्या ? "

" होय. "

" त्यांचा आवाज स्पष्ट, मधुर व थोडासा ममताळूपणाचा होता ? "

" होय. "

" आणि आई, चालतांना त्यांच्या पायांतील जोडे फटक् फटक् वाजले ? "

" मला वाटतें खरें तसें. "



गोपू—आई हा काय प्रकार घडला आहे?
हें सर्व कोणीं केलें?

"तर मग," आनंदित होऊन गोपू मोठ्या गंभीरपणें म्हणाला — जणूं काय त्यानें एखादा मोठा शोधच लाविला होता — "तोच तो गृहस्थ."

"कोणचा गृहस्थ?" त्याच्या आईनें उलट विचारिलें. "कोणचा म्हणजे? तोच तो, कीं ज्यानें मला रुपया दिला आणि हा पाहा तो रुपया." असें अभिमानानें म्हणून गोपूनें खिशांतील तो ( भानगडीचा ) रुपया सतरंजीवर फेकला.

"म्हणजे गोपूदादा, तुला तो गृहस्थ अखेरीस सांपडलाच ना?"

इतक्या वेळांत आतांच कोठें पहिल्यानें शांतीला मध्येंच बोलण्याची संधी मिळाली.

"होय शांते," तिचा भाऊ म्हणाला, "आणि मीं तो रुपया त्या गृहस्थांना परतही दिला. पण त्यांनीं तो उलट मलाच परत बक्षीस म्हणून दिला व मजजवळच तो ठेवून देण्यास सांगितलें."

"पण त्या गृहस्थांना आपल्या ह्या गरीब बिऱ्हाडाचा पत्ता कसा लागला?" त्याच्या आईनें विचारिलें.

"हात्तिच्या" मोठ्या माणसाप्रमाणें शाहाणपणाचा आविर्भाव आणण्याचा प्रयत्न करीत गोपू म्हणाला, "मला त्याचा सर्व उलगडा करतां येईल असें वाटतें. तो सर्व प्रकार हा असा झाला पाहा — मीं तो रुपया त्यांना परत दिला तेव्हां त्या गृहस्थांनीं मला, — तुझें नांव काय? तूं कोठें राहातोस? घरीं आणखी कोण माणसें आहेत? तुझ्यासंबंधीं, माझ्यासंबंधीं व शांतीची देखील त्यांनीं सगळी माहिती विचारली आणि आणखीही बरेचसे प्रश्न मला केले. त्यांच्या सर्व प्रश्नांचीं शक्य तितक्या स्पष्ट रीतीनें मीं उत्तरें दिलीं व माहिती सांगितली. बहुतेक ती सर्व माहिती त्यांनीं आपल्या स्मरणवहींत टिपून घेतली. पण आई, त्या गृहस्थांचा प्रत्यक्ष ह्या ठिकाणीं आपल्या घरीं येण्याचा बेत असावा ही

कल्पना देखील मला नव्हती. आई, ते येथें आल्यावर माझ्यासंबंधीं त्यांनीं कांहीं विचारिलें ?"

"होय" मथुराबाई म्हणाल्या "गोपू नांवाचा तुम्हांला एक मुलगा आहे काय व तो रस्त्यावरून कापूर-उदबत्ती विकत असतो काय, असें त्या गृहस्थांनीं मला विचारिलें. त्यांनीं हें विचारतांच मला किती धसका बसला म्हणून सांगूं ? आपला रुपया कोणच्या मुलाला दिला हें कळून गोपू, तुला चोर ठरविण्यास ते आले अशीच मला प्रथम भीति वाटली. परंतु रुपया आपण खरचला नसल्यामुळें मला थोडा धीर आला. त्यानंतर आपल्या सांपत्तिक स्थितीसंबंधीं व घरासंबंधीं बरेच प्रश्न मला विचारून ते सद्गृहस्थ निघून गेले. पण आश्चर्य म्हणजे, त्या रुपयासंबंधीं एका अक्षरानें देखील त्यांनीं मला कांहींच विचारिलें नाहीं किंवा तुझी आणि त्यांची रस्त्यांत गांठ पडली हें देखील त्यांनीं मला सांगितलें नाहीं."

"त्या गृहस्थांनींच हें सामान आणिलें ?" गोपूनें चौकशी केली.

"नाहीं. परंतु खुद्द त्यांनींच पाठवून दिलें असलें पाहिजे अशी माझी खात्री आहे. ते निघून गेल्यावर सरासरी अर्ध्या तासानें एक मजूर हा स्टोव्ह, कंदील, स्पिरीटची बाटली, सतरंजीची गुंडाळी व चटई एका मोठ्या हाऱ्यांत घेऊन आला. त्याच्याच पाठोपाठ दुसरा एक गडी हें बाकीचें सामान घेऊन आला व माझ्या हातांत १० रुपयांची नोट व हें पत्र देऊन म्हणाला, 'रावसाहेबांनीं हें तुम्हांस द्यावयास सांगितलें आहे.' असो. गोपू हें पाहा तें पत्र."

श्री.

मथुराबाई, तुमच्या हुशार मुलाची व माझी गांठ पडली. आपल्यासारख्या सद्गुणी, सुशील व प्रामाणिक कुटुंबाला अशा गरिबींत दिवस काढणें भाग पडत आहे त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. मला तुमचें फार कौतुक वाटतें.

इतःपर तुम्हांस 'भगिनी' समजून हें सर्व सामान व पैसे (१० रु.) तुमच्या घरीं पाठवून देत आहें. ते तुम्हीं निःसंकोचपणें ठेवून घ्यावेत अशी तुमच्या ह्या नम्र भावाची फार इच्छा व आग्रह आहे. ह्या वर्षीं तुमचा दिवाळसण सुखांत जावा अशी माझी इच्छा आहे. मी उद्यां रात्रीच्या गाडीनें परगांवीं जाणार आहें. तरी तुमच्या त्या प्रामाणिक गोपूस उद्यां दुपारीं चार वाजतां मजकडे पाठवावें. त्याला मला कांहीं सांगावयाचें आहे. माझा पत्ता खालीं दिला आहे. तेथें मी त्याला भेटेन.

**पत्ता**:— ११७, सोमवारपेठ,
बालाजीच्या देवळाजवळ,
शेकाटे ह्यांचा वाडा

आपला बंधु,
**भगवंतराव**

"गोपू, हें पत्र नीट जपून ठेव व उद्यां त्या ठिकाणीं वेळेवर जा."

गोपूनें तें पत्र घेतलें व एकदा स्वतः वाचून, काळजीपूर्वक घडी करून खिशांत ठेवलें व म्हटलें, "मी विनचूक जाईनच. पण आई, त्या गृहस्थाचे आपणांवर किती उपकार आहेत ग? आतां दिवाळींत मजा करावयास सांपडणार. आई! उद्यां मी सकाळींच मंडईत सहज जातों. ते जर सकाळच्याच वेळीं त्या रस्त्यावर दिसले तर फार चांगलें होईल. पण आई, आतां मला फार भूक लागली आहे. आतां आपण सर्वजण त्या डब्यांतील गोड गोड पदार्थ खाऊं."

नंतर तिघेंजण फराळ करावयास बसलीं. त्या वेळीं त्यांना किती आनंद झाला असेल बरें? खरोखर, त्या मोठ्या शहरांत त्या रात्रीं, ह्या गरीब कुटुंबाइतके आनंदी व समाधानी लोक दुसरे आढळले असते किंवा नाहीं ही शंकाच आहे.

फराळ करतां करतां गोपू आपल्या आईस म्हणाला, " आई, उद्यां मला भगवंतरावांनीं कशाकरितां बोलाविलें असावें ? तुला काय वाटतें ? "

" तसें मला नक्की कसें सांगतां येणार ? पण त्या भेटीमुळें तुझा भाग्योदय होणार असें मात्र माझ्या मनाला वाटूं लागलें आहे. "

" मी सांगतें. मी सांगतें. " बालस्वभावास अनुसरून लहानगी शांता गडबडीनें म्हणाली, " मला वाटतें गोपूदादा, तुला रगड पैसे देण्याकरितां व आईला आणखी जिन्नस देण्याकरितां आणि मला आणखी गोड गोड खाऊचे पुडे देण्याकरितांच त्यांनीं तुला बोलाविलें आहे. " आनंदानें टाळ्या वाजवून शांती हसूं लागली.

" आणि मला असें वाटतें, " तिचा भाऊ थट्टेनें म्हणाला, " कीं शांते, तुला कांहींच कळत नाहीं. "

फराळ झाल्यावर उष्टीं वगैरे काढून मथुराबाई समईपाशीं बसून मनांतल्या मनांत देवाची प्रार्थना करूं लागल्या. आज किती तरी दिवसांनीं त्यांना रात्रीची विश्रांति मिळाली होती. कारण नेहमीं ह्या वेळीं त्या डोळेफोड करून कसलें तरी शिवणकाम करीत बसलेल्या दिसावयाच्या.

परंतु मुलांना इतका आनंद झाला होता कीं नुसतें स्वस्थ बसणें त्यांना आतां बिलकुल शक्य नव्हतें. गडी लोक सामान घेऊन वांकत वांकत कसे आले ह्याची नक्कल ती छोटी शांता आपल्या भावास करून दाखवीत होती. गोपूचीही करमणूक झाली. त्या दोघां मुलांची बडबड सारखी सुरूच होती. सकाळपासून ज्या गोष्टी घडून आल्या, त्यासंबंधीं तीं दोघें पुनः पुन्हा बोलत होतीं व उद्यां काय आश्चर्यकारक गोष्टी घडून येतील ह्याविषयीं तर्क करीत होतीं.

त्या मुलांची आई त्यांचें बोलणें ऐकून मधून मधून स्मित करी. उद्यांही फायद्याचीच गोष्ट घडेल अशी तिला आशा वाटत होती. आपणांस

व आपल्या मुलाना इतःपर गरिबींत व हालअपेष्टांत दिवस काढावे लागणार नाहींत अशी तिला एक तऱ्हेची प्रेरणा होत होती. कां कोण जाणे !

करंडींतील फटाके वगैरे दारू जमिनीवर काढून मोजून पुन्हा करंडींत लगबगीनें भरावयाची असें करण्यांत छोटी शांता गुंतली. फटाके पाहून गोपूलाही आनंद झालेला होता. खरोखर, लहान मुलांना दिवाळीसारखा दुसरा आवडता सण नसेल. अहाहा ! काय तो खमंग पदार्थांचा वास व फटाक्यांचा फट् फट् आवाज !

जरा वेळानें मथुराबाई म्हणाल्या, "आज आपण एक धडा शिकलों. माझ्या आईनें देखील मी लहान असतांना हेंच सांगितलें होतें. माझ्या लाडक्या मुलांनो, मुलांनीं तो कधींही विसरतां कामा नये. तो धडा म्हणजे नेहमीं खरेपणानेंच वागावें. समजा, त्या गृहस्थांनीं गोपूला नजरचुकीनें दिलेला रुपया आपण ठेवून घेतला असता व विशेष विचार न करतां खर्च करून टाकला असता, तर आज आपणांस इतकी मदत व भगवंतरावांसारखे थोर मित्र प्राप्त झाले असते काय ? आपल्याही मनाला अपराधी माणसाप्रमाणें हुरहुर लागली असती. गोपू, तसें केलें असतें तर तुला भगवंतरावांच्या तोंडाकडे पाहण्याची छाती झाली नसती. कारण जेव्हां जेव्हां तूं त्यांच्या चेहेऱ्याकडे पाहशील तेव्हां तेव्हां तुझ्या मनाला, लबाडी करून आपण ह्यांचा अपराध केलेला आहे अशी टोंचणी लागली असती व तुझ्या शेजारून ते गृहस्थ जाऊं लागले कीं तुला त्यांची भीतीच वाटली असती. आपण दडपून ठेवलेल्या रुपयासंबंधींच हे गृहस्थ आपणांस प्रश्न विचारणार आहेत असेंच तुला प्रत्येक वेळेला वाटलें असतें."

"होय. मला तसेंच वाटलें असतें." गोपू म्हणाला, "पण मजजवळच तो रुपया आहे हें त्यांना ठाऊक नव्हतें."

"पण तुझें तुला स्वतःला ठाऊक होतें ना? कोणत्याही प्रामाणिक मुलाचें मन खिन्न व दोषी करण्यास तेवढी जाणीव पुरेशी होती. शिवाय, तूं जर तो रुपया त्यांना परत केला नसतास, तर भगवंतरावांना आपली व आपल्या ह्या घराची व स्थितीची कांहींच माहिती झाली नसती व आपणांस त्यांना ही अशी मदत बिलकूल करतां आली नसती."

"पण समजा, त्यांनीं रुपया परत घेऊन आपली कांहींच चौकशी न करतां ते तडक चालते झाले असते तर?" गोपूनें पुन्हा शंका काढली. गोपू कांहीं आतां अगदींच लहान नव्हता. कोणत्याही प्रश्नाच्या शंका-कुशंका काढून वादविवाद करण्याचें व मनाचें समाधान होईपर्यंत उलट पुनः पुनः प्रश्न विचारण्याचें त्याचें हें वयच होतें.

"तसे ते गेले असते तरी आपल्या मनाला समाधान झालेंच असतें ना? सत्यानेंच आपण वागलों हें पाहून आपल्या मनाला संतोष झाला नसता? सर्व बक्षिसांत स्वतःच्या मनाला संतोष वाटणें ह्यासारखें दुसरें कोणतेंही चांगलें बक्षीस नसेल."

"खरेंच आई. आपण ह्या बाबतींत केलें तेंच बरोबर केलें." गोपू म्हणाला.

"होय मुला," त्याच्या आईनें उत्तर दिलें, "आणि असेंच प्रत्येक गोष्टींत केलें पाहिजे. खरें बोलणें आणि प्रामाणिकपणानें वागणें हे मोठे सद्गुण आहेत. शेवटीं सत्याचाच जय होतो."

ह्या उपदेशामुळें मुलांच्या मनावर फारच परिणाम झाला. आईचे ते साधे व जोरदार शब्द मुलांच्या अंतःकरणांत पूर्णपणें बिंबून गेले. त्यांच्या पुढील आयुष्यांत त्यांना त्या धड्याचा फारच उपयोग झाला.

# प्रकरण पांचवें

त्या रात्रीं त्या तिघांना फार शांत व गाढ झोंप लागली. दुसऱ्या दिवशीं पहाटेस अभ्यंगस्नान करून (कारण दिवाळीचा तो पहिला दिवस होता) त्या दोन मुलांनीं मोठ्या मजेंत फटाके उडविले. फराळ झाल्यावर नऊच्या सुमारास गोपू बाहेर पडला व रमत रमत मंडईच्या रस्त्यानें जाऊं लागला. त्याच्या पाठीवर सामानाची पिशवी होतीच व तोही आज फार खुपींत असल्यानें "कापूर-उदबत्ती" असें फारच मोठ्या आवाजांत हर्षभरानें म्हणत होता. भगवंतराव दिसताहेत किंवा नाहीं हें पाहण्याकरतां तो मधून मधून इकडे तिकडे मान वळवी.

आणि खरोखरच थोड्या वेळानें भगवंतराव त्या रस्त्यावरून जात असतांना गोपूला दिसले. एकदम पुढें धांवत जाऊन त्यांच्याशीं बोलावें असें गोपूच्या मनांत फार होतें. पण तसें करावें किंवा नाहीं असा त्याला विचार पडला. कारण ह्या वेळीं भगवंतराव एकटेच नसून त्यांच्याबरोबर दुसरा एक गृहस्थ होता व ते दोघेजण मोठ्या गंभीरपणें एकमेकांशीं बोलत बोलत चालले होते. गोपूकडे भगवंतरावांचें लक्ष गेलें नाहीं असें दिसलें; कारण ते तसेच पुढें चालले. आपणांस ह्यानीं पाहिलें नाहीं तरी निदान आपला आवाज तरी त्यांच्या कानावर पडेलच असें वाटून गोपू एकदम; "कापूर–उदबत्ती, सुवासिक अगरबत्ती" असें ओरडला. परिचयाचा तो खणखणीत आवाज ऐकतांच भगवंतराव एकदम मागें वळून आश्चर्यानें म्हणाले, "कोण गोपू? अरे आज सकाळीं देखील तूं विक्री करावयास आलास वाटतें? मला वाटत होतें कीं तूं आज विश्रांति घेशील म्हणून; कारण काल तुला फारच त्रास झालेला होता."

" नाहीं रावसाहेब," गोपू अदबीनें म्हणाला, " विनाकारण काम टाकून विश्रांति घेण्याचा विचार माझ्या मनांत कधींच येत नाहीं. आळसांत वेळ घालवूं नये असें आई नेहमीं म्हणत असते."

हें ऐकून भगवंतरावांनीं स्मित केलें. " पण रावसाहेब मला — मला " थोडें अडखळत अडखळत गोपू म्हणाला, " रावसाहेब मला ..."

" छे छे गोपू, आतां मला वेळ नाहीं. संध्याकाळीं त्या पत्त्यावर ये. चुकूं नकोस." असें म्हणून भगवंतराव पुढें झटकले व थोड्याच वेळांत ते व त्यांच्याबरोबरचा गृहस्थ गर्दींत दिसेनासे झाले.

त्या पत्रांत सांगितलेल्या पत्त्यावर गोपू संध्याकाळीं भगवंतरावांच्याकडे न चुकतां गेला हें सांगावयास नकोच. शेकाटे ह्यांच्या वाड्यांत तो जाण्यास आणि टण्-टण् टण्-टण् असे घड्याळाचे चार ठोके पडण्यास एकच गांठ पडली. विक्रीच्या सामानाची नेहमींची पिशवी त्यानें खांद्यावर टाकलेली होतीच.

गोपू भगवंतरावांच्या खोलींत भीतभीतच शिरला.

" शाबास. अगदीं वेळेवर आलास. मुला, नेहमीं असेंच वक्तशीरपणें वागावें. ह्या खुर्चीवर बैस." भगवंतराव म्हणाले.

भगवंतरावांच्या टेबलावर तीन चार जाड पुस्तकें होतीं व कांहीं महत्त्वाचे कागदपत्र वाचण्यांत ते गढून गेले होते असें गोपूला दिसलें.

अशा ऑफिसच्या भपकेदार खोलींत, अनोळखी मोठ्या माणसासमोर खुर्चीवर बसण्याचा गोपूचा पहिलाच प्रसंग होता. त्यामुळें तो जरा बिचकल्यासारखा झाला. खांद्यावरील आपली पिशवी तशीच खांद्यावर असावी किंवा कोठें ठेवून द्यावी हें त्याला सुचेना. गोपूच्या गोंधळलेल्या स्थितीकडे लक्ष जाऊन भगवंतराव म्हणाले, " गोपू, ती पिशवी त्या पलीकडल्या बांकावर ठेवून दे आणि ह्या खुर्चीवर बसून राहा."

गोपूनें त्याप्रमाणें केलें व खुर्चीवर बसला. भीतीनें तो थरथर कांपतच ~~होता. अनोळखी माणसासमोर खुर्चीवर बसून बोलण्याचा त्याचा हा~~ पहिलाच प्रसंग असल्यानें तो घाबरल्यासारखा झाला होता. "भगवंतराव काय सांगणार आहेत कोण जाणें," असें तो मनांत म्हणाला.

थोड्या वेळानें भगवंतरावांनीं गोपूला त्याच्या बापाची व आईची नानातऱ्हेची माहिती विचारली व बरेच प्रश्न केले. गोपूचें शिक्षण किती झालें आहे, तो शाळेंत जातो किंवा नाहीं, कापूर-उदबत्ती विकणाऱ्या मुलाचा धंदा इतक्या लहान वयांत पत्करण्यास त्याला कोणीं सांगितलें, त्यानें तो कां पत्करला वगैरे प्रश्न त्यांनीं गोपूला विचारले.


थोडी भीड चेपल्यावर गोपूनें न घाबरतां त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें नीट स्पष्टपणें दिलीं. त्याच्या मुद्रेवरून व निर्भीडपणाच्या बोलण्यावरून, हा मुलगा सांगत असलेलें अगदीं खरें व बरोबर आहे अशी भगवंतरावांची खात्री झाली. विशेषतः कापूर—उदबत्ती आपण कां विकूं लागलों ह्याचीं गोपूनें सांगितलेलीं कारणें ऐकून त्यांना बरेंच समाधान वाटलें.

"तो धंदा एक तऱ्हेचा स्वतंत्र होता आणि मजजवळ भांडवलही अगदीं थोडें होतें व आईलाही, प्रामाणिकपणानें वागून थोडी मदत झाली असती." असें कारण गोपूनें त्यांना सांगितलें होतें.

"बरोबर. अशाच तत्वावर धंदा करावयास हवा," भगवंतराव म्हणाले, "सचोटीनें चालणें नेहमीं फायदेशीर असतें."

"होय रावसाहेब." गोपूनें उत्तर केलें, "माझी आई असेंच म्हणते."

"मुला, तुझी आई फारच सद्गुणी व खंबीर अंतःकरणाची असली पाहिजे. गरिबीमुळें तुझ्या आईस आतां काळजी करण्याचें कारण नाहीं. तुझी मात्र नीट व्यवस्था लावून दिली पाहिजे."



गोपू — रावसाहेब, आईपासून व वहिणीपासून मला दूर ठेवूं नका.

" रावसाहेब, माझी विनंती आहे. आईपासून व बहिणीपासून मला दूर ठेवूं नका. " गोपू हळूच म्हणाला. त्याच्या बोलण्यावरून आपणास दूर ठेवण्याचा त्यांचा विचार असावा असें वाटून गोपू म्हणाला होता.

पण भगवंतरावांच्या बोलण्याचा तसा उद्देश नव्हता. ते किंचित् हसून म्हणाले, " घाबरूं नकोस गोपू. तसें मी करणार नाहीं. तूं त्यांच्याबरोबरच राहशील व उदरनिर्वाहाकरितां त्यांना जास्त मदत करूं शकशील. मीं माझ्या हाताखालींच तुला घेतला असता, मण मी ह्या शहरांत नेहमींचा राहणारा नाहीं व तुला देण्यासारखें कामही मजजवळ नाहीं. तरी पण, माझ्या एका परम मित्रास देण्याकरतां मी तुला एक शिफारसवजा चिठ्ठी देणार आहें. ते तुला चांगल्या उद्योगाला लावतील. पण गोपू, तुला थोडेंबहुत तरी इंग्रजी शिकावयास हवें. मी येथल्या इंग्लिश शाळेच्या हेडमास्तरांना भेटलों होतों. त्यांनीं तुला शाळेंत नादार म्हणून घेण्याचें कबूल केलें आहे. शाळाही सकाळची असते. त्यामुळें तुझा जास्त फायदा होणार आहे. ज्या मित्राकडे ही चिठ्ठी मी तुला घेऊन जाण्यास सांगणार आहें, त्या मित्राचा एक मोठा छापखाना आहे. त्याच्या छापखान्यांत एक नवीन तरतरीत व हुषार मुलगा ठेवावयाचा आहे. आमचें आज सकाळींच बोलणें झालें. तुला संध्याकाळीं तीन तास तिकडे काम करावयास लागेल. ते स्वभावानें अत्यंत मायाळू व गरिबांचे कनवाळू आहेत. परवां, म्हणजे शनिवारीं दुपारीं बरोबर दोन वाजतां तूं ही चिठ्ठी घेऊन त्यांच्याकडे जा. पण एक गोष्ट राहिलीच. गोपू, तुम्हांला ती बोळकंडींतील घाणेरडी जागा ताबडतोब सोडली पाहिजे. दुसऱ्या एका हवाशीर जागीं तुमच्याकरितां मीं चार खणांची चांगली जागा पाहून ठेविली आहे. भाड्याची वगैरे सर्व व्यवस्था मींच केली आहे. उद्यां तुम्ही बिऱ्हाड बदलण्याच्या तयारींत असा. मी आज रात्रीं गांवाला जाणार नाहीं. उद्यां रात्रीं जाणार आहें. उद्यां मी सकाळीं तुमच्या घरीं येऊन सामानसुमान हलविण्याची व्यवस्था करणार आहें. तुमच्या जेवणाखाण्याची व्यवस्थाही मीच पाहणार आहें.

दरमहा तुम्हांला मी पैसे पाठवीत जाईन. तुमच्यासारख्या गरीब व अत्यंत सद्गुणी कुटुंबाची मला अशा अकल्पित तऱ्हेनें माहिती झाली व म्हणूनच मदत करतां आली ह्याबद्दल मला अत्यंत संतोष होत आहे. ठीक आहे. मुला, आतां तूं जा घरीं. ही चिठ्ठी घे" असें म्हणून भगवंतरावांनीं शिफारसवजा एक चिठ्ठी गोपूच्या पुढें केली.

भगवंतरावांचें भाषण ऐकून गोपू इतका आश्चर्यचकित होऊन गेला होता कीं आपण ही चिठ्ठी घेऊन त्यांच्या ऑफिसच्या बाहेर केव्हां पडलों व रस्ता चालूं लागलों, ह्याची देखील त्याला शुद्ध उरली नव्हती.

ती चिठ्ठी पाकिटांत बंद करून दिलेली नव्हती. फक्त एका सुट्या नोटपेपरवर लिहिलेली होती. त्यामुळें गोपूस ती वाचतां आली. चिठ्ठींतील मजकूर खालीलप्रमाणें होता.

श्री

प्रिय आत्माराम सगुणजी,

आज सकाळीं तुम्हांला मीं ज्याविषयीं सांगितलें तोच, हा चिठ्ठी घेऊन येणारा मुलगा गोपू आहे. धंदेवाल्या मनुष्यास फार उपयोगीं पडणारे असे चार पांच प्रमुख गुण ह्या मुलाच्या अंगीं आहेत. हा प्रामाणिक, हुषार व सचोटीनें चालणारा आहे. दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याची उत्कट इच्छा ह्याच्या अंगीं आहे व ह्याची आई अत्यंत सुशील व सद्गुणी आहे.

तुझा प्रियमित्र,

**भगवंतराव**

चिठ्ठीच्या पाठीवर आत्माराम सगुणजीचा पत्ता लिहिलेला होता. त्यांचा छापखाना फार मोठा व प्रसिद्ध होता.

\+ + +

दुसऱ्या दिवशीं गोपूचें बिऱ्हाड, ठरल्याप्रमाणें चांगल्या नवीन जागीं गेलें हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

शनिवारीं दुपारी गोपू ती चिट्ठी घेऊन आत्माराम सगुणजीच्या छापखान्याच्या ऑफिसांत वेळेवर गेला. भगवंतरावाप्रमाणेंच आत्मारामजींनींही गोपूस निरनिराळे प्रश्न विचारले. गोपूचीं उत्तरें ऐकून ते ताबडतोब खूष झाले व हुषार, तरतरीत, चलाख आणि प्रामाणिक गोपूस त्यांनीं कामावर घेतलें व सोमवारपासून छापखान्यांत रुजू होण्यास सांगितलें. त्याप्रमाणें गोपू सोमवारपासून छापखान्यांत जाऊं लागला.

अर्थात् पहिल्या प्रथम एकदोन महिने गोपूस पगार अगदींच थोडा होता. पण आतां गोपूस कोणत्याही तऱ्हेचें वाईट वाटत नव्हतें. पहिल्या महिन्याचा आपला छोटा पगार त्यानें आईच्या हवालीं केला, तेव्हां त्या मुलास किती अभिमान व संतोष वाटला असेल बरें ?

इकडे सकाळीं गोपूची शाळाही चांगली चालली होती. तो सर्व विषयांत उत्तम तऱ्हेनें पास होई.

छापखान्यांतही, गोपू अत्यंत मन लावून काम करीत असे. छापखान्याच्या धंद्यासंबंधीं शक्य तितकी सर्व माहिती करून घेण्याचा गोपूनें मनांत, निश्चय केलेला होता. भगवंतरावांनीं गोपूसंबंधीं केलेली अपेक्षा तिळमात्रही कमी ठरली नाहीं. मालकाचा व छापखान्यांतील इतर माणसांचा त्यानें लवकरच विश्वास संपादन केला. गोपूची हुषारी पाहून त्याचा पगारही हळुहळू वाढविण्यांत आला.

पगार वाढला तेव्हां गोपूनें आपल्या धाकट्या बहिणीला मुलींच्या हायस्कूलमध्यें घातलें. तिच्या फीला पुरून आईलाही उरतील इतके पैसे त्याला आतां मिळत होते.

यथाकालीं गोपू मॅट्रिकची परीक्षा चांगल्या रीतीनें पास झाला. तोंपर्यंत छापखान्याच्याही सर्व कामांत तो अत्यंत तरबेज झाला होता. हें पाहून

आत्मारामजींनीं गोपूस आपल्या छापखान्यांत मुख्य मॅनेजर नेमलें. अर्थात् गोपूला आतां पगारही फार मिळत होता.

गोपू, शांता व मथुराबाई ह्यांना आंतां कोणत्याही तऱ्हेची कमतरता नव्हती. तीं आतां श्रीमंत झालीं होतीं. अशा प्रकारें त्या गरीब कुटुंबाचा भाग्योदय झाला.

गोपू आपल्या लहानपणच्या गरिबाच्या स्थितीची आठवण कधींही विसरला नाहीं. इतर गरीब मुलांना त्यानें सढळ हातानें मदत केली. भगवंतरावांचे उपकार तो कधींही विसरला नाहीं. ज्यामुळें त्याचा इतका उत्कर्ष झाला, तो "नजरचुकीचा रुपया" गोपूनें पुढील आयुष्यांत स्मरणार्थ म्हणून जसाच्या तसाच राखून ठेविला.

त्या रुपयाकडे पाहून त्याला आईच्या ह्या वाक्याची आठवण होई :

—खरें बोलावें व प्रामाणिकपणानें वागावें. अखेर सत्याचाच जय होत असतो—

लहानपणीं तो रुपया अगदीं अडचणीच्या वेळीं खर्च करण्याचा जबरदस्त मोह गोपूला झालेला होता. मथुराबाईच्या वरील उपदेशानेंच त्या मोहाचा गोपूच्या हातून प्रतिकार झाला व पुढें सर्वांची अशा तऱ्हेनें भरभराट झाली.

मुलांनो, मथुराबाईचे शब्द तुम्हीं नीट ध्यानांत ठेवा व त्याचप्रमाणें वागा म्हणजे तुमचेंही कल्याण होईल.

३८७६
IRBK-0103816
IRBK-0103816

# मुलांसाठीं निवडक साहित्य

## किती हसाल?

लेखक वि. मा. दी. पटवर्धन

हंडाभर [illegible] गहूं...हडकुळ्या मुलांची [illegible] हाका मारणारा मासा...स्त्री–शिक्षणावरून इस्त्री!...मिळून साऱ्याच पोट दुखेतों हसविणाऱ्या गोष्टी!

पृष्ठें १०० मूल्य एक रुपया

## चिंगी

लेखक ना. धों. ताम्हनकर

एका कामांत चार कामें करणारी ही, तुमच्या आमच्यासारखीच एक मुलगी म्हणजे प्रसिद्ध गोट्याची धाकटी बहीण!

पृष्ठें १०५ मूल्य सव्वा रुपया

## नऊ नाथ

लेखक भा. श्री. परांजपे

मच्छिन्द्र, रेवण, नागनाथ, इत्यादि नाथ-पंथीय साधुपुरुषांनीं सिद्धि कशा प्राप्त करून घेतल्या? चरित्रकथनाची पद्धति तुम्हांला अगदीं नवीन तऱ्हेची वाटेल.

पृष्ठें ७१ मूल्य दहा आणे

## चंपाराणी

लेखक वामन चोरघडे

सावत्र आईनें कितीही छळलें तरी ब्राह्मणकन्या चंपा अखेर राणी झालीच! माणुसकीनें ओतप्रोत भरलेली अथपासून इतिपर्यंत चटका लावणारी एक लोककथा.

पृष्ठें ९६ मूल्य एक रुपया

## पऱ्याची चाळ

लेखक स. ना. सूर्यवंशी

पऱ्याच्या चाळींतलीं बेवारशी भटकीं मुलें, पण शिक्षणाच्या जादूनें त्यांचा 'पुढारी' कसा खराखुरा सुधारक बनतो तें ह्या छोट्या कादंबरींत वाचा.

पृष्ठें १०४ मूल्य एक रुपया

## चन्दू : १

लेखक श्री. शं. खानवेलकर

सर्वांनीं गुंड म्हणून झिडकारलेला हा पोर खरोखर किती उद्योगी नि उपकारी वृत्तीचा होता तें वाचूनच कळेल.

पृष्ठें ९८ मूल्य एक रुपया

## तीन थोर देशभक्त

लेखक ना. सी. फडके

दादाभाई नवरोजी, टेरेन्स मॅकस्विनी आणि डी व्हॅलेरा ह्या तिघांचीं चरित्रें म्हणजे हिंदुस्थान व आयर्लंड ह्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा रोमहर्षक प्रारंभच होय.

पृष्ठें १६४ मूल्य सव्वा रुपया

## झेलम

लेखक शरचंद्र टोंगो

काश्मीरच्या कोळी जीवनांतली ही लोककथा म्हणजे अनेक मानवी स्वभावांचें एकत्र संमेलनच आहे. गोष्टींतलें रहस्य तुम्हांला चटका लावील.

पृष्ठें ६४ मूल्य बारा आणे

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई

२६५३०
वा.वा
६५८
२०।[illegible]।६४